शुक्रवार, २३ सप्टेंबर २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ६६
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग


कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी/३,६
पेणमधील मूर्तिकारांची देवीच्या मूर्ती बनविण्याची लगबग/७
प्रो-कबड्डीचा थरार ७ ऑक्टोबरपासून रंगणार/८


## नागपुरात आज टीम इंडिया ऑस्ट्रेलियाशी भिडणार



**नागपूर** : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टी-२० सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर शुक्रवारी (दि. २३) होणार आहे. या मैदानावरील भारताचा विक्रम पाहता, गेल्या सहा वर्षांपासून भारत येथे हरलेला नाही. तब्बल तीन वर्षानंतर उपराजधानीत भारत-ऑस्ट्रेलियात दुसऱ्या टी-२० क्रिकेट सामना रंगणार आहे. या सामन्याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींमध्ये शिगेला पोहचली आहे. अल्पावधीतच या क्रिकेट सामन्याची तिकिटे विकली गेली आहेत. १५ मार्च २०१६ रोजी नागपुरात भारताचा शेवटचा पराभव झाला होता. त्यानंतर भारताने येथे एकही सामना गमावलेला नाही. त्यामुळे शुक्रवारी होणाऱ्या सामन्यासाठी उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

# नवीन पनवेल उड्डाणपुलावर भाजपचा ‘रास्ता रोको’

## सिडको प्रशासन नरमले; रविवारपर्यंत खड्डे भरणार





(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल उड्डाणपुलावरील खड्डे भरण्यासाठी भाजपतर्फे गुरुवारी (दि. २२) ‘रास्ता रोको’ आंदोलन करण्यात आले. यानंतर रविवारपर्यंत खड्डे भरून रस्त्याच्या चारही बाजूच्या सिमेंट काँक्रिटीकरणाची निविदा आठवड्याच्या आत काढण्याचे आश्वासन सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले. त्यानंतर रास्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आले. सिडकोने लोकांच्या तक्रारींची दखल न घेतल्यास आम्हाला अशी आंदोलने वारंवार करावी लागतील, असा इशारा या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला. (पान २ वर..)

संदीप पाटील यांनी पत्र देऊन सहा दिवस झाले तरी सिडकोचे अधिकारी उत्तर देत नाहीत. हा रस्ता महापालिकेकडे हस्तांतरीत झाला नसल्याने त्याचे काम महापालिका करू शकत नाही. त्यामुळे हे काम सिडकोनेच करायला पाहिजे. सिडकोने आपल्या कारभारात सुधारणा करणे गरजेचे आहे. अशीच समस्या खांदा कॉलनी, पोदीच्या भुयारी मार्गाची व या भागातील पाण्याची आहे. त्यासाठीही आम्ही पोलिसांना पत्र देऊन आंदोलनाचा इशारा आता देणार आहोत. आपण सर्व वेळ काढून आलात त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. नागरिकांना त्रास सहन करायला लागला त्याबद्दलही दिलगिरी व्यक्त करतो. रविवारी खड्डे न भरल्यास सोमवारी पुन्हा आंदोलन करण्याचा निर्णय घेऊ.

**-आमदार प्रशांत ठाकूर**, रायगड जिल्हाध्यक्ष, भाजप

# एनआयए आणि ईडीची नवी मुंबई, पनवेलमध्ये धाड

## पनवेलमधून एक, तर नेरूळमधील चौघे ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि अंमलबजावणी संचालनालयातर्फे (ईडी) देशातील वेगवेगळ्या राज्यात छापेमारी सुरू आहे. या कारवाईत दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय)च्या नवी मुंबईतील नेरूळ येथील कार्यालयावर एनआयए व ईडीने गुरुवारी (दि. २२) पहाटे धाड टाकली. या कारवाईत नेरुळमधून चौघांना तर पनवेलमधून एकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

एनआयए आणि ईडीने आतापर्यंत १०० सदस्यांना ताब्यात घेतले आहे. देशभरातील १० राज्यांत एनआयए आणि ईडीने संयुक्तरित्या ही छापेमारी केली आहे. आंध्रप्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू आणि अन्य काही राज्यात छापेमारी केली आहे. दहशतवाद्यांना निधी पुरवणे, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, बंदी घातलेल्या संघटनांमध्ये जाण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित आणि बेकायदेशीर कृत्य करणे या आरोपांखाली पीएफआयच्या सदस्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. यामध्ये नवी मुंबईतील नेरूळ येथील पीएफआयच्या कार्यालयात गुरुवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास छापेमारी केली आहे. त्याचप्रमाणे पनवेलमध्येसुद्धा छापेमारी करण्यात आली आहे. यामध्ये नेरूळमधून चार जणांना तर पनवेलमधून एकाला ताब्यात घेतले आहे.

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेवर भारत सरकारने बंदी घातली आहे. असे असले तरी नेरूळ सेक्टर २३ करावेगाव या गावठाण भागात त्यांचे कार्यालय आहे. या ठिकाणी राष्ट्रीय तपास विभागाने धाड टाकल्यानंतर तब्बल सात तासांच्या तपासणीनंतर चार जणांना ताब्यात घेतले आहे. यातील एक व्यक्ती याच परिसरातील रहिवासी असल्याचेही बोलले जाते. सुमारे ५० कर्मचारी, अधिकाऱ्यांचा ताफा या ठिकाणी असून कसून चौकशी करीत आहेत, तसेच तपासात आढळलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे, मात्र याबाबत थेट प्रतिक्रिया देण्यास नकार देण्यात आला आहे. कार्यालय असलेला परिसरसात दैनंदिन गरजा भागावणारी दुकाने आहेत, मात्र या छापेमारीनंतर या कार्यालय आणि त्या ठिकाणी काम करणाऱ्यांनी या कारवाईबाबत मौन बाळगले आहे.

### राज्यभरात १६ जणांवर कारवाई

एनआयएने दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपाखाली देशभरात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या कार्यालयांवर छापेमारी केली आहे. यात महाराष्ट्रातील कार्यालयांचाही समावेश आहे. या कारवाईत महाराष्ट्रातून पीएफआयच्या सुमारे १६ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

## निवडक

### उल्हासनगरमध्ये इमारतीचा स्लॅब कोसळून चौघांचा मृत्यू

**उल्हासनगर** : कॅम्प ५ भागातील मानस टॉवर या इमारतीच्या चौथ्या मजल्याचा स्लॅब कोसळून तळमजल्यावर आला. यात एका कुटुंबातील तीन तर तळमजल्यावरील दुकानातील एक असा चौघांचा मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवारी (दि. २२) दुपारच्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच अग्नीशमन दल, पोलीस आणि पालिकेचे अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. सागर ओचानी (१९), रेणू धनवानी (५५) धोलानदास धनवानी (५८) आणि प्रिया धनवानी (२४) अशी मृतांची नावे आहेत.

### बनावट नोटांचा सर्वांत मोठा पुरवठादार नेपाळमध्ये ठार

**काठमांडू** : पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेचा एजंट म्हणून काम करणाऱ्याला नेपाळमध्ये ठार करण्यात आले. काठमांडूमध्ये आश्रय घेतलेल्या ठिकाणाबाहेर सोमवारी (दि. १९) त्याची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार, तो भारतात आयएसआयच्या बनावट नोटांचा सर्वांत मोठा पुरवठादार होता. लाल मोहम्मद उर्फ मोहम्मद दर्जी असे त्याचे नाव आहे.

# उद्धव ठाकरेंचे भाषण निराशेचे

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रत्युत्तर



**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरेंचे कालचे भाषण म्हणजे, निराशेचे होते. तुम्ही २०१९ला माझा शेवट होणार म्हणून प्रयत्न केला. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून मला संपवण्यासाठी अडीच वर्षे प्रयत्न केले, पण कुणीही मला संपवून शकले नाही, मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है, वही होता है जो तकदीर में लिखा होता है! असे म्हणत भाजपचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना टोला लगावला.

शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या गटप्रमुखांच्या मेळाव्यातून भाजप आणि शिंदे गटावर टीका केली होती. त्यांच्या या टीकेला फडणवीस यांनी आपल्या शैलीत उत्तर दिले.

उद्धव ठाकरेंचे कालचे भाषण म्हणजे निराशेचे होते. माझा त्यांना सवाल आहे की, आम्ही एकत्र लढलो आणि जास्त जागांसह निवडून आलो. त्यावेळी आमच्या पाठीमध्ये खंजीर खुपसला तेव्हा राजीनामा का दिला नाही? त्यावेळी निवडणुका का घेतल्या नाही? तुम्ही काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत नाही तर आमच्यासोबत निवडून आला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो वापरून निवडून आला होता. हिंमत होती तर त्यावेळी राजीनामे द्यायचे होते आणि काँग्रेस, राष्ट्रवादीसोबत निवडणूक लढवून विजयी होऊन दाखवायचे.

यामुळे मला असे वाटते, त्यांचे भाषण हे निराशेचे भाषण होते. ते असेही म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांची शेवटची निवडणूक असेल, पण मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है, वही होता है जो तकदीर में लिखा होता है! तुम्ही २०१९ला माझा शेवट होणार असे म्हणून प्रयत्न केला. तिघांनाही मिळून मला संपवण्यासाठी अडीच वर्षे प्रयत्न केले, पण कुणीही मला संपवून शकले नाही, अशी टीकाही फडणवीसांनी केली.

## दसरा मेळाव्यासंदर्भात आज पुन्हा सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्यासाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गटाने मागितलेली परवानगी महानगरपालिकेने नाकारल्याच्या पार्श्वभूमीवर सुधारित याचिका करण्याची ठाकरे यांच्या शिवसेनेची मागणी उच्च न्यायालयाने मान्य केली. त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी (दि. २३) केली जाणार आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने केलेली मध्यस्थ याचिकाही ठाकरे गटाच्या याचिकेसह सुनावणीसाठी ठेवण्याचे न्यायमूर्ती रमेश धनुका आणि न्यायमूर्ती कमळ खाता यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. स्थानिक आमदार सदा सरवणकर यांनी शिंदे गटासाठी याचिका दाखल केली आहे.

उद्धव ठाकरे यांचा गट त्यांची शिवसेना खरी असल्याचा दावा करून न्यायालयाची दिशाभूल करीत असल्याचा आरोप करून ठाकरे गटाची याचिका फेटाळण्याची मागणी सरवणकर यांनी केली आहे. शिंदे गटाची शिवसेना खरी असून शिवाजी पार्कवर आम्हाला दसरा मेळाव्यासाठी देण्याची मागणी करणारा अर्ज महानगरपालिकेकडे केल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

## पेण अर्बन बँक ठेवीदार आज घालणार घोटाळेबाजांचे श्राद्ध



**पेण : प्रतिनिधी**

पेण अर्बन बँक घोटाळ्यात भरडलेल्या ठेवीदार आणि खातेदारांना १२ वर्षांनंतरही न्याय मिळाला नसल्याने शुक्रवारी (दि. २३) बँकेच्या मुख्य शाखेजवळ संघर्ष समितीतर्फे घोटाळेबाजांचे श्राद्ध घालून मृत ठेवीदारांना आदरांजली वाहण्यात येणार आहे.

७५८ कोटींचा घोटाळा होऊन बुडीत निघालेल्या पेण अर्बन बँकेला आता १२ वर्षे पूर्ण झाली तरी या बँकेच्या सुमारे एक लाख ९८ हजार ठेवीदारांना न्याय मिळत नसल्याने या वर्षी संघर्ष समितीच्या वतीने अर्बन बँकेतील आतापर्यंत पाचशेहून अधिक मृत झालेल्या ठेवीदारांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यासाठी आणि बँक बुडव्या प्रमुख घोटाळेबाजांचे श्राद्ध घालण्यासाठी रायगडसह मुंबईसारख्या ठिकाणी असणाऱ्या लाखो ठेवीदारांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात पेणमध्ये एकत्र येणार आहेत.

२३ सप्टेंबर २०१० रोजी या बँकेचा भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर आता या घटनेला १२ वर्षे म्हणजेच एक तप पूर्ण होऊनदेखील न्याय मिळत नाही. याचा निषेध व मृत ठेवीदारांना आदरांजली आणि प्रमुख घोटाळेबाजांचे श्राद्ध घालण्यासाठी पेणमधील नागरिकांनी आणि बँकेच्या ठेवीदार, खातेदारांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी ११ वाजता जमण्याचे आवाहन समितीचे कार्याध्यक्ष नरेंद्र जाधव यांनी केले आहे.

# झेडपीपीएफएमएस प्रणालीमध्ये ‘राजिप’ राज्यात प्रथम



**अलिबाग : प्रतिनिधी**

वार्षिक लेखा विहीत वेळेत स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालयाकडे (झेडपीएफएमएस)राज्यात प्रथम सादर करण्याचा बहुमान रायगड जिल्हा परिषदेने मिळविला आहे.

गतिमान प्रशासन आणि पारदर्शक कामकाज यामुळे राज्यात रायगड जिल्हा परिषदेने आपले वेगळेपण जपले आहे. जिल्हा परिषदेने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचा २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा लेखा झेडपीएफएमएस ऑनलाइन प्रणालीमध्ये तयार केला असून, वार्षिक लेखा विहीत वेळेत स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालयाकडे सादर करण्याचा बहुमान रायगड जिल्हा परिषदेने मिळविला आहे. झेडपीएफएमएस या ऑनलाइन प्रणालीमुळे अंदाजपत्रक तयार करणे, प्रशासकीय मान्यता, कार्यादेश, देयक तयार करणे, देयक तपासणी सूची, अखर्चित रक्कम शासन खाती भरणा करणे या बाबी अत्यंत सोप्या व सुटसुटीत झाल्या आहेत.

ग्रामविकास विभागाने तयार केलेल्या झेडपीएफएमएस या संगणकीय प्रणालीमध्ये कामकाज पूर्ण करून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा लेखा विहीत वेळेत स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालयाकडे सादर करण्याचा पहिला बहुमान रायगड जिल्हा परिषदेला मिळाला आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी भगवान घाडगे यांचा सततचा पाठपुरावा आणि मार्गदर्शनाखाली सहाय्यक लेखाधिकारी छगन मावची व झेडपीएफएमएस राज्य समन्वयक संजीवनी घरत यांनी हे कामकाज विहीत वेळेत पूर्ण केले.

वित्त विभागातील लेखा शाखेने केलेल्या कार्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## कर्मवीरांना अभिवादन..!





पनवेल : शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे शिक्षणमहर्षी तथा पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची १३५वी जयंती गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातील कृष्णाळे तलावाजवळ असलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अर्धाकृती पुतळ्यास भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# ‘त्या’ वेळी उद्धव ठाकरे कुठे होते

## गटमेळाव्यातील टिकेवर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेचा जन्म १९ जून १९६६रोजी झाला, तेव्हा उद्धव ठाकरे हे केवळ सहा वर्षांचे होते, असे म्हणत केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी खोचक टोला लगावला आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी मुंबईतील गटमेळाव्यात बुधवारी (२१ सप्टेंबर) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपा आणि शिंदे गटावर हल्ला चढविला. यावरून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिले. तसेच उद्धव ठाकरे आधी मंत्र्यांची बैठक घ्यायचे, आता गटप्रमुखांच्या बैठक घेताहेत



इथपर्यंत ते आले आहेत, असा चिमटाही राणेंनी काढला.

केंद्रीय मंत्री राणे पुढे म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी अमित शाहांनी जमीन दाखवा असे वक्तव्य केल्याचे म्हणाले. मात्र, त्याचा अर्थ त्यांना कळाला नाही. शाहांना जमिनीवर या असे म्हणायचे होते. आता हे म्हणतात आम्ही ‘आसमान’ दाखवू. उद्धव ठाकरे असे कोणाच्या जीवावर म्हणत आहेत? शिवसेनेचा जन्म १९ जून १९६६ रोजी झाला. तेव्हा उद्धव ठाकरे केवळ सहा वर्षांचे होते, असा सणसणीत टोला राणेंनी लगावला आहे.

उद्धव ठाकरे शिवसेनेत आले, तेव्हापासून शिवसेना मराठी माणूस आणि हिंदुत्वासाठी संघर्ष करत होती. त्यात उद्धव ठाकरे कुठेच नव्हते. ते १९९९मध्ये शिवसेनेत सक्रिय झालेत. मी मुख्यमंत्री झालो आणि त्यांना घरून कोणीतरी सांगितले की, राणे मुख्यमंत्री झाले, तूही कार्यरत राहा, मुख्यमंत्री होशील म्हणून ते शिवसेनेत आले. तोपर्यंत ते शिवसेनेत सक्रिय नव्हते. एवढी आंदोलने झाली, शिवसैनिक लढत होते, मार खात होते, एन्काऊंटर होत होते, तुरुंगात जात होते तेव्हा हे कोठे होते? असा सवालही केंद्रीय मंत्री राणेंनी ठाकरे यांना विचारला आहे.

ते पुढे असेही म्हणाले, उद्धव ठाकरेंना ६२ वे वर्ष सुरू आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात पक्षवाढीसाठी कधी संघर्ष केला का? ते काहीच न करता सरळ सरळ मुख्यमंत्रिपदावर आले. तेव्हाही मी म्हणालो होतो की, हे आयत्या बिळावर नागोबा आहेत, अशीही टीका राणेंनी या वेळी केली.

# उद्धव ठाकरेंना परिवारच दिसतो

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

**नागपूर : प्रतिनिधी**

माझे कुटुंब माझी जबाबदारी, आम्ही फक्त चार राहू बाकी कोणीच राहणार नाही. चाळीस आमदार सोडून गेले. अजून जे काही राहिले आहेत, तेही जातील अशी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांना ठाकरे परिवाराशिवाय कोणीच दिसत नाही, अशा शब्दात भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरे यांच्या टीकेचा कडक समाचार घेतला. ते नागपूर येथे पत्रकारांशी बोलत होते.



प्रदेशाध्यक्ष बावनकुळे पुढे म्हणाले, एखादा माणूस खूप घाबरला की, मनातली भिती दिसू नये यासाठी मोठमोठ्याने बोलतो. त्या पद्धतीने आपली भिती बाहेर दिसू नये यासाठी उद्धव ठाकरे अशी वक्तव्ये करत आहेत. ते पुढे असेही म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या काळात अडीच वर्षे सूडभावनेने विरोधकांना दाबण्याचा प्रयत्न केला. आजही ते सुधारलेले दिसत नाहीत. त्यांना आमच्या नेत्यांवर आणि पक्षावर टीका केल्याशिवाय काहीच सुचत नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार त्यांनी स्वीकारल्यामुळे अजूनही ते सूडबुद्धीचे राजकारण करत आहेत. त्यांचे सूडबुद्धीचे हे राजकारण फार काळ टिकणार नाही असेही ते म्हणाले.

# पनवेल महापालिका हद्दीत माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान राबविण्यात येणार

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात ‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित ’ अभियान २६ सप्टेंबर ते पाच ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १८ वर्षावरील महिला, माता, गरोदर यांची सर्वांगीण तपासणी या दरम्यान पालिका क्षेत्रातील सर्व सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवरती करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व महिलांनी या अभियानात सहभाग घ्यावा असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित ’अभियानाबाबत चर्चा करण्यासाठी महापालिका मुख्यालयात गुरुवारी (२२ सप्टेंबर) उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, प्रभारी मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.रेहाना मुजावर, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, वैद्यकीय अधिकारी तसेच महापालिका



क्षेत्रातील विविध वैद्यकीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या अभियानांतर्गत १८ वर्षावरील सर्व महिला, माता, गरोदर स्त्रिया यांची आरोग्य तपासणी, प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अभियानासाठी एमजीएमचे स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ तसेच पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील प्रसिध्द स्त्रीरोग रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ आपली सेवा देणार आहेत. तसेच महिलांना व बालकांना फॉलिक, कॅल्शिअम, आयर्न अशी आवश्यकतेनुसार औषधेही देण्यात येणार आहेत.

या अभियानांतर्गत गर्भधारणापूर्व काळजी आणि मानसिक आरोग्य, स्तनपान, व्यसनमुक्ती, पोषण या विषयांवरती समुपदेशन कार्यक्रमही राबविण्यात येणार आहे. यासाठी नवविवाहित महिलांनी या अभियानांतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांशी संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. याबरोबरच या अभियानांमध्ये सोनोग्राफी शिबिरही घेण्यात येणार आहे. यामध्ये चेस्ट एक्सरे, आवश्यकतेनुसार मॅमोग्राफी करण्यात येणार आहे.तसेच महिला व मातांचे हिमोग्लोबीन, रक्त-लघवी यांच्या तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत. माता-बालकांचे लसीकरणही करण्यात येणार आहे. ३० वर्षावरील स्त्रियांचे रोग, रक्तदाब, मधुमेह स्क्रींनिंग करण्यात येणार आहे. २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान ‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ या अभियानात महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त महिलांनी सहभाग होऊन आपली तपासणी करावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आली आहे.

# उरण करळ उड्डाण पुलावर बस आणि कार अपघातात चालक जखमी



**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील करळ उड्डाण पुलावर गुरुवारी सकाळी ६.३० च्या सुमारास उरण शहराकडून नवीमुंबई शहराकडे जाणाऱ्या एनएमएमटी बस व व्हॅगनारची समोरा समोर धडक होऊन अपघात झाला आहे. यात कारचा चालक जखमी झाला.

पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार उरण तालुक्यातील करळ उड्डाण पुलावर उरण शहरातून नवी मुंबई शहराकडे जाणाऱ्या एनएमएमटी या प्रवाशी बस गाडीला करळ उड्डाणपूलावरुन विरुद्ध दिशेने येणाऱ्या व्हॅगनार कारने समोरासमोर धडक दिली. यात कारचालक जखमी झाला आहे. घटनास्थळी न्हावाशेवा वाहतूक पोलिसांसह न्हावाशेवा पोलिसांनी धाव घेत जखमी चालकास तातडीने रुग्णालयात दाखल केले आहे.

पान १ वरून

## नवीन पनवेल उड्डाणपुलावर भाजपचा रास्ता रोको

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (दि. २२) सकाळी ११ वाजता पुलावर भर पावसात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. नवीन पनवेल-माथेरान महामार्गाला जोडणाऱ्या या उड्डाणपुलाची पावसामुळे दूरवस्था झाली आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे रोज अपघात होऊन अनेक जण जखमी होत आहेत, तर काहींना कायमचे जायबंदी व्हावे लागत आहे. या पुलावरील रहदारीचा विचार करता पुलाच्या उतारावरील दोन्ही बाजूला सिमेंट काँक्रिटीकरण होणे गरजेचे असताना सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करण्यात आला. त्यामुळे सुकापूर, आदई सर्कलपर्यंत व महामार्गावर वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागल्या होत्या.

या आंदोलनात पनवेल महापालिकचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, सुनिल घरत, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, संतोष शेट्टी, नितीन पाटील, अजय बहिरा, मनोहर म्हात्रे, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका चारुशीला घरत, सुशीला धरत, ॲड. वृशाली वाघमारे, राजश्री वावेकर, भिमराव पोवार, शशिकांत शेळके, दक्षिण भारतीय सेलचे जिल्हा संयोजक श्रीनिवास कोहरु, ॲड. जितेंद्र घरत, माजी नगरसेविका संगीता कांडपाल, गौरव कांडपिळे, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, पंचायत समितीचे सदस्य राज पाटील, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, खांदा कॉलनी युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक भोपी, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, उदीत नाईक, विवेक होन, अक्षय सिंग, देवांशू प्रभाळे, अशोक आंबेकर, पप्पू साळवे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलकांनी रस्ता अडवल्यावर सिडकोचे बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता आमदारांना भेटून, आम्ही दोन महिन्यात टेंडर प्रक्रिया सुरू करतो, तुम्ही आंदोलन मागे घ्या सांगत होते, पण त्याला नकार देऊन सर्वांनी पावसात रस्त्यावर ठाण मांडले. त्यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक बंद झाली. सुकापूर, आदई सर्कलपर्यंत व महामार्गावर लागल्या होत्या. महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नवीन पनवेलला येणाऱ्या मार्गावरील वाहतूक पोलीस निरीक्षक सुभाष कोकाटे यांच्या विनंतीनुसार काही वेळ सुरू करून दिली होती. शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी भारतीय जनता पक्षातर्फे पोलीस आणि आंदोलकांचे आभार मानले.

**नवीन पनवेलला जोडणाऱ्या पुलाच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे अपघात होतात, अनेक जण जखमी होतात. वाहनांचेही नुकसान होते. पुलाच्या दोन्ही बाजूला उतारावर चौक असल्यास तेथील रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करायचे असते हे सिडकोला व त्यांच्या अधिकाऱ्यांना माहित नाही का? दरवर्षी पावसाळ्यात तात्पुरती दुरूस्ती केली जाते. मी स्वत: मागील वर्षी आणि या वर्षी जुलैमध्ये डांबर टाकून खड्डे भरले होते. सिडकोच्या अधिकाऱ्यांना लोकांशी काही देणे-घेणे नसल्याने आम्हाला असे आंदोलन करावे लागले.**

**-परेश ठाकूर,**
**माजी सभागृह नेते, पनवेल मनपा**

**नवीन पनवेलला जोडणाऱ्या पुलाच्या दोन्ही बाजूला दरवर्षी मोठ्या प्रमाणात खड्डे पडतात. यासाठी आम्ही नवी मुंबईच्या धर्तीवर प्रत्येक चौकात सिमेंट काँक्रिटीकरण करण्याची मागणी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून दोन वर्षे करीत आहोत, पण सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने आम्हाला हे आंदोलन करावे लागले.**

**-संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष तथा शहर उपाध्यक्ष, भाजप**

### *रुग्णवाहिकेला दिली वाट*

*एचडीएफसी सर्कल येथे रस्ता रोको केल्यामुळे पनवेल-माथेरान रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. खांदा कॉलनी आणि पोदीमार्गे वाहने वळवण्यात आले. यादरम्यान एक रुग्णवाहिका अडकल्याचे पाहून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार रुग्णवाहिकेला वाट करून देण्यात आली.*

# वेदांता-फॉक्सकॉनसाठी माजी मुख्यमंत्र्यांची बैठकही नाही

## मंत्री गिरीश महाजन यांची टीका

**पुणे : प्रतिनिधी**

वेदांता-फॉक्सकॉन कंपनीने राज्य सरकारला चार जानेवारीला पत्र देवून, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी साधी एकही बैठक घेतली नाही. त्यांनी बैठक घेतली असती तर गोष्ट वेगळी होती. दोन वर्षे ते घराबाहेरच पडले नाहीत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कंपनी मालकांना भेटले पण कंपनीने आम्ही दोन महिन्यांपूर्वीच गुजरातला जाण्याचा निर्णय



घेतला. त्यामुळे आता ओरडून उपयोग नाही, अशी टीका ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन यांनी चिंचवड येथे पत्रकार परिषदेत केली. या वेळी केंद्रीय पंचायत राज मंत्री कपिल पाटील उपस्थित होते.

महाजन म्हणाले, गुजरातपेक्षा महाराष्ट्रात जास्त गुंतवणूक राहील, हे फडणवीस बोलले ते खरे आहे. आव्हान आहे पण समर्थपणे ते पेलणारे खांदेही आहेत. चुकीमुळे वेदांत प्रकल्प गेला पण निश्चितपणे त्यापेक्षा मोठे प्रकल्प येथे येतील.

जलयुक्त शिवार योजनेची सखोल चौकशी मागील महाविकास आघाडी सरकारने करून त्यांच्या काळातच त्यांनी ‘क्लीन चिट’ दिली. ग्रामीण भागात गायरान क्षेत्रावरील अतिक्रमणाबाबत तक्रारी आल्यास आम्ही ते काढण्याचे काम सुरु केले आहे. जनावरांच्या लम्पी आजारावर आम्ही युद्ध पातळीवर काम करत आहोत. लागण झालेल्या पाच किलोमीटरच्या परिसरात सर्वच जनावरांना लसीकरण करत आहोत. या रोगाचा प्रादुर्भाव असेल त्या भागात बैल पोळा करणे योग्य नाही. परंतु सक्ती नाही, असेही त्यांनी सांगितले. दसरा मेळाव्यासंदर्भात उद्धव ठाकरे यांनी दुसरीकडे जागा बघावी, असे सांगून ते म्हणाले की, ठाकरे यांचे एक महिन्यात निवडणुका घ्या म्हणणे म्हणजे ‘आत्या बाईंना मिशा असत्या तर’ या म्हणीप्रमाणे आहे. जर-तरच्या गोष्टी ते करतात. ते खूप अस्वस्थ आहेत असेही महाजन म्हणाले.

# पेण कामार्लीत एटीएम फोडण्याचा प्रयत्न : एका आरोपीला अटक



**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील कामार्ली येथील बॅंकेचे एटीएम फोडण्याच्या प्रयत्न दरोडेखोरांनी गुरुवारी पहाटेच्या सुमारास केला असून यावेळी जागरूक नागरिकांनी पळून जाणाऱ्या दोन आरोपींपैकी एकास पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले तर दुसरा आरोपी पळून जाण्यात यशस्वी ठरला.

पेण पूर्व विभागात कामार्ली गावात बॅंक ऑफ इंडियाची शाखा असून याठिकाणीच बॅंकेचे एटीएम आहे. बुधवारी बॅंक नेहमीप्रमाणे बंद झाल्यावर गुरुवारी पहाटेच्या सुमारास आरोपींनी बॅंकेचा एटीएम जिलेटिनच्या सहाय्याने फोडून दरोडा टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. यावेळी येथील ग्रामस्थांनी एटीएमजवळ संशयितरित्या कृत्य करणाऱ्या दोन अनोळखी व्यक्तींना पाहिले व त्यांना पकडण्यासाठी धावले. त्याच वेळेला रात्रीच्या गस्तीवर असलेले पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ व त्यांच्या सहकार्याने नागरिकांच्या मदतीने आरोपी संतोष कांबळे ( वय ३४ रा. पुणे) याला ताब्यात घेतले.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. २३ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी

## भाजप नेते परेश ठाकूर यांचा पालखीमध्ये उत्स्फूर्त सहभाग



**उलवे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या संस्थापक, पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५वी जयंत्ती ठिकठिकाणी साजरी करण्यात आली. त्यानिमित्त उलवे येथील रयतच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. लेझीम आणि ढोल ताशाच्या गजरात ही मिरवणूक परिसरात फिरवून कर्मवीर अण्णांचा जयजयकार करण्यात आला. या मिरवणूकीत विद्यालयाचे चेअरमन तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सहभागी होत पालखीला खांदा दिला.

विद्यालयातील मराठी माध्यम यांच्या तर्फे शालेय अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा वकृत्व स्पर्धा रांगोळी स्पर्धा यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करून जयंती विशेष सप्ताह कर्मवीर भाऊराव पाटील जयंती विशेष सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत गुरुवारी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी सीबीएसई विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, मराठी माध्यमाचे चेअरमन शरद खारकर, प्राचार्या मुक्ता खटावकर, सुजाता बल्लाळ, यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मार्केट यार्डमधील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल मार्केट यार्ड विद्यालयात पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३५ वा जयंती सोहळा गुरुवारी (दि. २२) साजरा करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे व्हाईस चेअरमन तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच आयोजित पालखीला खांदा दिला.

महात्मा फुले कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातर्फेही कर्मवीर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली पनवेल शहरातील कर्मवीर भाऊ पाटील यांच्या पुतळ्याजवळ आली तेव्हा उपस्थित मान्यवरांची कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, जनरल बॉडी सदस्य तथा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगरसेवक राजू सोनी, ए.एस सी कॉलेजचे प्राचार्य गणेश ठाकूर, शैलेश पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर, न्यू इंग्लीश स्कूलचे मुख्याध्यापक आर. एल. प्रक्षाळे, उपशिक्षक एम. आर. पाटील यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि रयतसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जासई विद्यालयात विविध उपक्रम

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षणतज्ञ, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी विविध उपक्रम राबविण्यात आले.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष व कामगार नेते सुरेश पाटील विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, विद्यालयाचे मुख्याध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग आणि इतर मान्यवरांच्या हस्ते कर्मवीरांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर पालखी जासई गावात फिरविण्यात आली. पालखी घेऊन विद्यालयाच्या प्रांगणात माघारी आल्यानंतर रयत गीत व रयत माऊली गीत झाले. या वेळी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्यात आले.

या सोहळ्यासाठी जासईचे सरपंच संतोष घरत, उरण पं. स. माजी सभापती नरेश घरत, विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य गोपीनाथ ठाकूर, अमृत ठाकूर, प्रभाकर मुंबईकर, यशवंत घरत, शाळा व्यवस्थापन व विकास समितीच्या सदस्या मनिषा घरत आदी उपस्थित होते. पालखी सोहळ्याच्या नियोजनामध्ये महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक व ज्येष्ठ शिक्षक नुरा शेख विद्यालयातील गुरुकुल विभाग प्रमुख जी. आर. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख श्री. शिंदे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.



# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये अनोखी आदरांजली

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५वी जयंती अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात झाली. विद्यार्थ्यांनी या वेळी १३५ या आकड्याची मानवी साखळी तयार करून कर्मवीरांना अनोखी आदरांजली वाहिली.

सर्वप्रथम कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन तसेच पालखी तयार केली गेली. विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने कर्मवीरांचा जीवन परिचय व्हावा यासाठी प्रश्न-मंजूषा, हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. मुलांनी या स्पर्धांना भरभरून प्रतिसाद दिला. प्रश्नमंजूषेद्वारे कर्मवीरांच्या कार्याची माहिती मुलांना मिळाली. त्याचबरोबर कर्मवीरांच्या सन्मानार्थ उद्बोधक घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या तसेच भाषणही सादर केले.

विद्यार्थ्यांनी शिक्षणाची कास धरावी, असे प्रतिपादन या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे स्कूल कमिटी सदस्य राजेश गायकर यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमीच मार्गदर्शक म्हणून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर व विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही असेच उत्तमोत्तम विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवतो, असे मत शाळेच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांनी मांडले.



# सीकेटी महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात (स्वायत्त) इतिहास विभागाच्या वतीने गुरुवारी (दि. २२) कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती व महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव दिनही साजरा करण्यात आला

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनीकर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन केले आणि महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सव दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला व महाविद्यालयाच्या भविष्यातील वाटचालीबद्दल मार्गदर्शन केले. तसेच वाणिज्य शाखा प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव यांनीही महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. तर शिक्षकेत्तर कर्मचारी तानाजी देशमुख यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवन चरित्राचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन इतिहास विभाग प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी केले व सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील यांनी केले.

कार्यक्रमाला आय. क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस.एन. वाजेकर, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, कलाशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील तसेच महाविद्यालयातील ११६ प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एम. ए. म्हात्रे, ग्रामीण विकास विभाग प्रमुख डॉ. एस. एम. भोईर, डॉ. जी. एस. तन्वर, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जी. यु. पाटील, प्रा. भावेश भोईर यांचे विशेष सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.





# नवरात्रोत्सव शांततेत करण्यासाठी पनवेल तालुका पोलिसांचे नागरिकांना मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

नवरात्रोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ २ अंतर्गत पनवेल तालुका पोलीस स्थानका नजीक असणाऱ्या मंथन हॉल येथे अत्यंत महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी (दि. २१) झालेल्या या बैठकीला पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी पोलीस सहआयुक्त भागवत सोनावणे आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर उपस्थित होते. पनवेल तालुका पोलीस स्थानकाच्या हद्दीतील नवरात्रोत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शांतता कमिटीचे प्रतिनिधी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.


या वेळी मार्गदर्शन करताना शिवराज पाटील यांनी महत्त्वपूर्ण अशा सूचना केल्या. ते म्हणाले की मा. न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश व महानगरपालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपाबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत तसे मर्यादित स्वरूपाचे मंडप उभारण्यात यावे. तसेच सार्वजनिक दुर्गा मुर्तीची सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी कोणताही आक्षेपार्ह देखावा नसावा ते पुढे म्हणाले की नवरात्रौत्सव ठिकाणी जातीय/धार्मिक भावना भडकून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे आक्षेपार्ह बॅनर,पोस्टर्स, देखावा किंवा फलक नसावा. त्याचप्रमाणे अशा प्रकारचे रेकॉर्ड्स/गाणी वाजविण्यात येवू नयेत. नवरात्रौत्सव मंडळ परिसरात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नियंत्रण ठेवण्यासाठी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्यात यावेत. विसर्जनावेळी नदी पत्रात ज्यांना पोहोता येत नाही अशांना नदी पात्रात उतरू देऊ नका त्यांच्याऐवजी स्वयंसेवक यांच्या मार्फत देवी मूर्तीचे विसर्जन करून घेणे. या वेळी नवरात्रौत्सव सणाचे अनुषंगाने इतर महत्वाच्या सुचना देवून मार्गदर्शन करण्यात आले.

# नवीन पनवेल स्टेशन परिसर उजळला

## 'रामप्रहर'मध्ये बातमी प्रसिद्ध होताच रस्त्यावरील पथदिवे सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल स्टेशन परिसरातील रस्त्यावरील पथ दिवे दोन महीने बंद होते. स्थानिक लोकप्रतिनिधीनी पाठपुरावा करून ही प्रशासकीय यंत्रणा दुर्लक्ष करीत होत्या, पण 'रामप्रहर'मध्ये बातमी प्रसिद्ध होताच पथदिवे बुधवारी (दि. २१) पुन्हा सुरू झाल्याने स्टेशन परिसर उजळून निघाला होता. त्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते



नवीन पनवेल सेक्टर १५ मध्ये रेल्वे स्टेशन कडून हॉटेल निलकमलकडे येणाऱ्या रस्त्यावरील पथदिवे दोन महिने बंद होते. त्यामुळे स्टेशन परिसरात काळोख होता. तेथे असलेल्या रिक्षा स्टँड व बस थांब्यावर ही काळोख असल्याने त्याचा फायदा पाकीटमार व मोबाइल चोरांना होत होता. विहीघर येथील प्रियंका रावतची पनवेल स्टेशन बाहेर निर्घुण हत्त्या झाली. काळोखामुळे मारेकऱ्यांना तेथून पळून जाणे शक्य झाले. या प्रकारामुळे रात्री उशिरा कामावरून येणाऱ्या महिलांमध्ये घबराट पसरली होती.

याबाबत बातमी प्रसिध्द होताच महापालिकेचे विद्युत विभागाचे प्रमुख प्रितम पाटील व नवीन पनवेलचे कनिष्ठ अभियंता निखिलेश पाटील यांनी स्वत: लक्ष घालून त्यांचे काम करून घेतले. बुधवारी हा परिसर उजळून निघाला.

**पथदिवे दोन महिने बंद होते. काळोखामुळे येथून जीव मुठीत घेऊन जावे लागते. बातमी प्रसिध्द होताच आज रात्री येथील परिसर उजळलेला दिसल्यावर समाधान वाटले.**
**-सुनीता वोकारा, रहिवासी**

# उरणमध्ये उद्या मोफत ई श्रम कार्ड, आधार नोंदणी शिबिर

**उरण : बातमीदार**

असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी भारत सरकारच्या ई-श्रम कार्ड ची नोंदणी व नॅशनल पेन्शन योजना (एनपीएस) ची नोंदणी शनिवारी (दि. २४) सकाळी ९.३० ते ५.३० या कालावधीत उरण तालुक्यातील कॉमन सर्विस सेंटर कोप्रोली येथे मोफत आयोजित करण्यात आली आहे.

नागरिकांनी या मोफत शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन कॉमन सर्व्हिस सेंटर कोप्रोली-उरणतर्फे करण्यात आले आहे. नोंदणीसाठी येताना नागरिकांनी ओरिजनल आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक व कोणताही चालू मोबाइल नंबर घेऊन स्वतः व्यक्ती येणे आवश्यक आहे. आधार कार्डला मोबाइल लिंक नसला तरी चालेल. याच दिवशी आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती कॅम्प घेतला जाणार आहे.

नागरिकांनी ई-श्रम कार्ड व नॅशनल पेन्शन योजनाचे कार्ड त्वरित काढावेत व भविष्यात कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालिका स्मिता म्हात्रे यांच्याकडून करण्यात आले आहे.

नागरिकांनी अधिक माहितीसाठी कॉमन सर्विस सेंटर, आधार सेंटर, युनियन बँके जवळ, कोप्रोली-उरण (९००४७६३३३९) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा नवे पाक्षिक सदर वाचाल तर वाचाल. या सदरात दर पंधरवड्याला आमच्या प्रिय वाचकांच्या भेटीला आणणार आहोत.

साहित्यिकांची आवडती पुस्तके येत्या २५ सप्टेंबर २०२२ रोजीच्या रविवारी वाचूया दिलीप प्रभाकर गडकरी (कर्जत) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.



## संपादकीय

# निराशसेनेचे अरण्यरुदन

एका मैदानाची बाब ती काय, त्यावरून इतके रणकंदन करण्याची काहीच जरुरी नाही. परंतु या दोन्ही गटांमधील वैमनस्य आता इतके पराकोटीला गेले आहे की अनेक नेत्यांचे निराशेपोटी भान सुटत चालले आहे.

**गोरेगाव येथील नेस्को मैदानात उद्धव ठाकरे समर्थक गटाने आयोजित केलेल्या गटप्रमुखांच्या मेळाव्याला खुर्च्यांची संख्या लक्षणीय दिसली. या मेळाव्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी संबोधित केले, तेव्हा उपस्थितांकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे शिवसेनेच्या जुन्या मेळाव्याची आठवण मात्र नक्कीच आली. परंतु हा सारा देखावा वरवरचा असल्याचे सतत जाणवत होते. दसरा मेळाव्यावरून ठाकरे गट आणि शिंदे समर्थकांच्या शिवसेनेमध्ये सध्या कडाक्याची जुंपलेली आहे. शिवाजी पार्क येथे दसरा मेळावा कोण घेणार हा प्रश्न खरे तर मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासकांनी निकालात काढला आहे. कायदा व सुव्यवस्थेचे मातेरे होऊ नये म्हणून दसऱ्याच्या दिवशी मेळाव्यासाठी शिवाजी पार्कचे मैदान कोणालाच न देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला हे योग्यच झाले. शिवसैनिक मग तो कुठल्याही गटाचा असो, तो मराठीच असतो. एका मैदानाच्या दुराग्रहापायी मराठी माणसांनीच एकमेकांची डोकी फोडणे योग्य नव्हे. शिंदे गटाने समजुतदारपणाने बांद्रा-कुर्ला संकुलातील पटांगण वेळीच आरक्षित करून ठेवले. तसा समजुतदारपणा ठाकरे गटाने दाखवला असता तर बरे झाले असते. पण आता त्यालाही उशीर झाला आहे. दसरा मेळाव्यावरून दोन्ही गट उच्च न्यायालयात गेले आहेत. न्यायालयाने मनाई केली तरी गनिमी काव्याने आम्ही शिवाजी पार्क येथे जमणारच आणि मेळावा घेणारच अशी भाषा ठाकरे समर्थक नेत्यांनी सुरू केल्याचे दिसते. त्यांचा हा पवित्रा दुर्दैवी म्हणावा लागेल. गोरेगाव येथील गटप्रमुखांच्या मेळाव्यात माजी मुख्यमंत्र्यांनी जे काही भाषण केले, त्यात देखील हीच निराशा डोकावत होती. कोथळा, बदला, गिधाडे, कुत्रे, गोचीड या शब्दांची लयलूट करत ठाकरे यांनी आपल्या मनातील मळमळ बऱ्याच दिवसांनी बाहेर काढली. त्यांच्या भाषणातील हे शब्दांचे विषारी बुडबुडे प्रभावी ठरतील अशी चिन्हे कुठेच दिसत नाहीत. भारतीय जनता पक्षाला कमळाबाई असे हिणवून त्यांनी स्वत:चे हसे मात्र करवून घेतले. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर तोंडसुख घेताना त्यांनी थोडेफार भान ठेवायला हवे होते. ते न ठेवल्यामुळे भाजपच्या नेत्यांनी गुरुवारी त्यांच्यावर जहरी पलटवार केले. अमित शाह यांना अस्मान दाखवण्याची भाषा करणाऱ्या ठाकरे यांना दोन महिन्यांपूर्वी आपणच भुईसपाट झालो हे वास्तवही लक्षात येऊ नये? हिंमत असेल तर भाजपने एका महिन्याच्या आत महापालिका आणि विधानसभेच्या निवडणुका घेऊन दाखवाव्यात अशी भंपक आव्हानाची भाषा ठाकरे यांनी केली. एका महिन्याच्या आत निवडणुका झाल्या तर ठाकरे गटाकडे असलेली उरलीसुरली चिंधी देखील नष्ट होईल हे साऱ्यांनाच ठाऊक आहे. त्यामुळेच त्यांचे भाषण शब्द बापुडे केवळ वारा या पठडीतले ठरले. त्यांच्या भाषणावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र अत्यंत संयमी भूमिका घेतली. आगामी निवडणूक फडणवीसांसाठी शेवटची निवडणूक ठरेल अशी वल्गना ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात केली. त्यावर फडणवीस यांनी स्मितहास्यापलीकडे फारशी प्रतिक्रिया दिली नाही. घायाळ विरोधकांच्या अरण्यरूदनावर बोलण्यासारखे काही उरलेच नव्हते, त्याला ते तरी काय करणार?**


# अलिबाग पर्यटन नगरीतील समस्या काही सुटेनात!

अलिबाग हे रायगड जिल्ह्याच्या मुख्यालयाचे शहर आहे. त्याचबरोबर ते पर्यटन स्थळही आहे. अलिबागची ओळख पर्यटननगरी अशीच आहे. या नगरीत वाहतूक कोंडी, उनाड जनावरे ही समस्या आहेच. आता शहारात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट सुरू आहे. अलिबागमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत आहे. या भटक्या कुत्र्यांमुळे अलिबागकर सध्या त्रस्त आहेत. पर्यटन नगरीतील समस्या तातडीने सोडवाव्यात अशी जनतेकडून मागणी होत आहे.

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर







अलिबाग नगरपालिकेने २०१८मध्ये भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला होता. त्यामध्ये सुमारे ७०० भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यात आली होती. त्यानंतर मोहीम बंद करण्यात आली. शहरातील भटक्या कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले होते. या कुत्र्यांनी बऱ्याच जणांचा चावा घेतला आहे. शहरात ठिकठिकाणी भटकी कुत्री फिरताना दिसत आहेत. शहरात कुत्र्यांचे भय नागरिकांमध्ये वाढले आहे. अलिबाग पालिकेने या कुत्र्यांच्या दहशतीपासून अलिबागकरांची तत्काळ सुटका करायला हवी.

शहरात मोकाट फिरणाऱ्या गुरांची समस्या आहेच. शहरात फिरणारी मोकाट गुरे ही वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत आहेत. या गुरांमुळे अपघातदेखील होत आहेत. एसटी बस स्थानकासमोरील रस्ता, बालाजी नाका, महेश टॉकीज समोरील रस्ता ही मोकाट जनावरांची आश्रयस्थाने आहेत. ही गुरे रास्ता रोको करावा त्याप्रमाणे रस्त्यावर ठाण मांडून बसलेली असतात. शहरात घोडेदेखील फिरत असतात. या घोड्यांमुळे देखील शहरात तसेच आसपासच्या परिसरात अपघात झाले आहेत. अलिबाग शहरात मोकाट फिरणाऱ्या या घोड्यांना लगाम घालण्यासाठी नगरपालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे. बेशिस्त वाहनचालक आणि रस्त्याच्या दुतर्फा ठाण मांडून बसणारे फेरीवाले यामुळे या समस्येत अधिकच भर टाकत आहेत. त्यामुळे शहरात वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. नगरपालिका आणि पोलिसांच्या दुर्लक्षामुळे पर्यटन स्थळ असलेल्या अलिबागमधील वाहतूक कोंडीत दिवसेंदिवस भर पडत आहे. याकडे अलिबाग नगरपरिषद प्रशासन व वाहतूक समस्येकडे पोलिसांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

दुसरीकडे वाहतूक कोंडी ही अलिबाग शहरातील मोठी समस्या आहे. अलिबाग शहरातील वाहतूक समस्येबाबत तोडगा काढण्यासाठी पोलीस अधिक्षकांकडे लेखी तक्रार करण्यात आली होती. यानंतर पोलीस अधिक्षकांनी अलिबाग पोलिसांना या संदर्भात तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले होते. गणेशोत्सवापूर्वी अलिबागचे पोलीस निरीक्षक शैलेश सणस यांनी यासंदर्भात एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला वाहतूक विभागाच्या पोलीस निरक्षक आणि अलिबाग नगर पालिकेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे उपस्थित होत्या. याबैठकीत वाहतुकीचे नियम करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली होती.

वाहतूक समस्येवर तोडगा काढण्यासंदर्भात नगर पालिका प्रशासन आणि अलिबाग पोलीस संयुक्त कारवाई नियमितपणे करतील असे यावेळी ठरविण्यात आले. दुसऱ्या दिवशी जुजबी कारवाई सुरु झाली. त्यानंतर मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष केल्याचे पहायला मिळत आहे. केवळ बैठका झाल्या. त्या पलीकडे अलिबाग पोलिसांनी काहीच केलेले नाही. कुणीही या समस्येकडे गांभीर्याने पहात नाहीत, हे दुर्दैव आहे.

अलिबाग शहरात महावीर चौक ते आंबेडकर पुतळा या मुख्य रस्त्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला २५ ते ३० हातगाडीवाले आणि फेरीवाले रस्त्याच्या मध्येच गाड्या लाऊन दिवसभर रस्त्या अडवून ठेवत असतात. एसटी स्थानकासमोरची वाहतूक कोंडी नित्याचीच झालेली आहे. या ठिकाणी ज्वेलर्सच्या समोर अनेकदा दुचाकी वाहने उभी केलेली असतात. त्यामुळे आगारातून बाहेर पडणाऱ्या बसेसना मुंबईच्या दिशेने जाताना वाहतुकीला अडथळा येतो आणि या ठिकाणी बऱ्याचदा वाहतूक कोंडी होत असते. यावर काही ठोस उपाययोजना करायला हवी अशी नागरिकांची मागणी आहे.

ब्राम्हण आळी परिसरात दुपारच्या तसेच संध्याकाळच्या दुतर्फा वाहन पार्कींगमुळे वाहतूक समस्या निर्माण होत आहे. कन्या शाळा आणि इंग्लिश मिडियम शाळा सुटताना दुपारी १२ ते १ कालावधीत प्रचंड कोंडी होत असते. ब्राम्हण आळीतील दत्तमंदिर ते जुनी नगरपालिका कार्यालय या पट्ट्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने उभी असतात. त्यामुळे उरलेल्या अरूंद जागेतून वाहन चालवत नेणे ही मोठी कसरत असते.

या शिवाय अलिबाग न्यायालय परिसर, जिल्हा परिषद कार्यालयासमोरही वाहनांची बेशिस्त पार्कींग होत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. समुद्र किनाऱ्यावरही शनिवार रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी वाहने अस्ताव्यस्त पार्क केली जात आहेत. या शिवाय बायपास रोडवरही सुट्टीच्या दिवशी वाहतूक समस्येला तोंड द्यावे लागत आहे. गणेशोत्सवानंतर ठोस कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. गणेशात्सव संपला तरी कारवाई करण्यात आलेली नाही.

## बदलते तंत्रज्ञान


# पार्किंगमध्ये गाडी हरवली? 'या' फीचरने घ्या शोध...

पार्किंगमध्ये गाडी शोधण्यात कधीकधी बराच वेळ वाया जातो, अशावेळी तुम्ही गूगलचे एक फीचर वापरून लगेच गाडी शोधू शकाल. कोणत्याही गोष्टीची माहिती हवी असेल तर आपण लगेच गूगल कर ना असे सहज म्हणतो. गूगलवर सर्च करण्याची आपल्याला इतकी सवय झाली आहे की, कोणत्याही गोष्टी बाबत शंका असेल किंवा एखादी गोष्ट आठवत नसेल तर लगेच आपण गूगलची मदत घेऊन खात्री करून घेतो. अनेक वेळा आपली मदत करणाऱ्या गूगलचा वापर करून पार्क केलेली कारदेखील शोधता येते हे बऱ्याच जणांना माहित नसेल. या फीचरचा वापर करून पार्किंग लॉटमधून कार शोधण्यासाठी मदत होते. हे फीचर काय आहे, याबाबत जाणून घेऊया.

पार्किंगमध्ये कार शोधण्यात कधीकधी आपला बराच वेळ वाया जातो, अशावेळी गूगलचे हे फीचर वापरून लगेच कार शोधता येणार आहे. गूगल मॅप्सकडून हे फीचर लॉँच करण्यात आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही पार्किंगची जागा मार्क करू शकता. यामुळे तुम्ही गाडी कुठे मार्क केली होती किंवा आता पार्किंग कुठे करू शकता ती जागा दाखविण्यात येईल. या फिचरमध्ये करंट लोकेशन सेव्ह करण्याचा पर्याय असेल. मोबाईलमध्ये पार्किंग लोकेशन सेव्ह करण्यासाठी तुमच्या मोबाईलमध्ये गूगल मॅपचे अपडेटेड वर्जन असणे आवश्यक आहे. तुमच्या मोबाईल मध्ये लोकेशन सर्विस इनेबल केले असल्याची खात्री करा. गूगल असिस्टंटलासुद्धा परवानगी देण्यात आल्याची खात्री करा. गाडी पार केल्यानंतर लोकेशन सेव्ह करा. त्यानंतर पार्किंगमधील गाडी शोधण्यासाठी सेव्ह केलेले लोकेशन उघडा आणि डायरेक्शन पर्यायावर क्लिक करा. यामुळे सहजरित्या पार्किंगची जागा किंवा पार्क केलेली गाडी शोधण्यात मदत होईल.




# ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग



डॉ. अभय बंग यांचा जन्म २३ सप्टेंबर १९५०मध्ये झाला. बालमृत्यू नियंत्रणावरील त्यांच्या संशोधनाची दखल भारतासोबतच अनेक देशांनी घेतली असून पाकिस्तान, नेपाळ, बांग्लादेश व अनेक आफ्रिकन देश त्यांनी तयार केलेल्या बालमृत्यू नियंत्रणाचे मॉडेल वापरतात. त्यांचे स्वत:च्या हृदयरोगावरील अनुभव कथनाचे माझा साक्षात्कारी हृदयरोग हे पुस्तक प्रसिद्ध आहे.

डॉ.अभय बंग हे ठाकूरदास आणि सुमन बंग यांचे पुत्र आहेत. ते दोघेही गांधीवादी कार्यकर्ते होते. ठाकूरदास बंग हे गांधीजींना

**निमित्त**

भेटले होते आणि गांधीजींच्या सांगण्यावरून त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला जाण्याऐवजी खेड्यांमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. डॉ. बंग हे वर्ध्याच्या सेवाग्राम आश्रमाच्या वातावरणात वाढले. गांधीजीनी सुरू केलेल्या नयी तालीम या शिक्षणपद्धतीत त्यांचे शिक्षण झाले. त्यांनी नागपूर मेडिकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस. ची पदवी मिळवली. यात त्यांना तीन विषयात सुवर्णपदके मिळाली. त्यानंतर भारतातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया पी.जी.आय. या संस्थेत त्यांनी काम केले. त्यांनी अमेरिकेच्या जॉन्स हॅपकिन्स विद्यापीठातून मास्टर्स इन पब्लिक हेल्थ ही पदवी १९८४ साली सुवर्णपदकासह मिळविली. तेथे त्यांनी कार्ल टेलर यांच्याकडून सार्वजनिक आरोग्याचे धडे घेतले. यामध्ये ते ९९ टक्के गुणांसह प्रथम आले. ते या संस्थेमध्ये संचालकही होऊ शकले असते. त्यांना अत्याधुनिक रुग्णालयात किंवा रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये काम करण्याच्या संधी चालून आल्या होत्या. पण त्यांनी शहरी, श्रीमंती आणि आरामशीर जीवनशैली नाकारली आणि गडचिरोलीसारख्या दुर्लक्षित भागाला आपले कार्यक्षेत्र म्हणून निवडले. डॉक्टर झाल्यावर वर्ध्याजवळच्या कान्हापूर आणि महाकाळ या गावात त्यांनी वैद्यकीय काम सुरू केले. समाज परिवर्तनाच्या चळवळीचे हत्यार म्हणून ही वैद्यकीय सेवा होती. परंतु सेवेच्या माध्यमातून समाज परिवर्तन करणे तेथे त्यांना जमले नाही. तेव्हा त्यांच्या कुटुंबाने मिळून चेतना विकास ही संस्था सुरू केली आणि त्यामार्फत रोजगार हमीच्या मजुरांचे संघटन सुरू केले. त्यांना दोन मुले आहेत. विचारी आणि शांत स्वभाव हे डॉ. अभय बंग यांचे वैशिष्ट्य आहे. डॉ. बंग हे डॉक्टर असल्याने त्यांनी फक्त आरोग्याचे काम करावे. त्यांनी दारूबंदीच्या भानगडीत पडू नये असे एका पोलीस अधिकाऱ्याचे मत होते. अशा प्रकारच्या कुठल्याच दबावाला बळी न पडता त्यांनी हे आंदोलन लोकांच्या मदतीने यशस्वी केले.

१९८८मध्ये सुरू केलेल्या एका महिला जागरण यात्रेत एका स्त्रीने दारूच्या समस्येबद्दल लक्ष वेधले. त्याबरोबर इतर स्त्रियांनीही त्यांच्या नवऱ्याया दारू पिण्यामुळे होणारे त्रास सांगितले आणि या समस्येवर काय करता येईल यावर अभय बंग आणि इतर सर्वांनी विचार केला. यावर १०४ गावांमध्ये एक अभ्यास करण्यात आला. यात दारूच्या अर्थशास्त्राविषयी माहिती जमवण्यात आली. गडचिरोलीतील अनेक स्वयंसेवी संघटना एकत्र आल्या आणि यांनी गडचिरोली जिल्हा दारूमुक्त करा अशी मागणी केली. यासाठी एक दारूमुक्ती संघटना स्थापन करण्यात आली. या काळात डॉ. बंग यांना मोठ्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. डॉ. बंग यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : दिवसेंदिवस वातावरणात कमालीचा बदल होत आहे. सततच्या पावसामुळे मच्छीमार त्रस्त आहेत. हवामानाचा अंदाज घेऊनच त्यांना बोटी समुद्रात सोडाव्या लागत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# धुळीची ॲलर्जी आहे का? 'या' उपचारांनी मिळेल आराम

धुळीच्या ॲलर्जीचा अनेकांना त्रास आहे. ही ॲलर्जी अनेक समस्यांना आमंत्रण देऊ शकते. धुळीच्या ॲलर्जीने श्वास घेण्यात त्रास होतो. ॲलर्जीने रोगप्रतिकार शक्तीदेखील घटण्याची शक्यता असते. धुळीच्या ॲलर्जीने सर्दी, ताप, खोकला हे आजार होऊ शकतात. त्यामुळे वेळीच यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. जीवनशैली आणि आहारामध्ये काही बदल करून या ॲलर्जीपासून आराम मिळू शकतो. तसेच काही घरगुती उपचारदेखील ही समस्या घालवण्यात फायदेशीर ठरू शकतात. यानुसार पुढील काही माहिती आम्ही देत आहोत.



१) **हळद**-हळद आरोग्यासाठी उपयुक्त मानली जाते. हळदीमध्ये औषधी गुणधर्म असतात, जे अनेक आजारांना कमी करण्यात फायदेशीर ठरतात. हळदीमधील कुरक्युमिनमध्ये दाहकता विरोधी गुणधर्म आहे. त्वचेला उजळ देण्यासाठी देखील हळदीचा वापर होतो. दुधात हळद मिसळून पिल्याने रोगप्रतिकार शक्ती वाढते. तसेच हळद ही शरीराला आतून मजबूत बनवते. या पार्श्वभूमीवर हळदीचा आहारात समावेश करावा.

**२) ग्रीन टी**-चांगले पचन आणि रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यात ग्रीन टी फायदेशीर आहे. ग्रीन टी धुळीच्या ॲलर्जीमुळे नाकातील जळजळ कमी करण्यास मदत करते. ग्रीन टीमुळे त्वचाही चांगली राहाते आणि वजनही कमी होते.

**३) मध**-मधाचे अनेक फायदे आहेत. मधाने धुळीच्या ॲलर्जीची लक्षणे कमी होऊ शकतात. मध घेताना ते शुद्ध असावे याची काळजी घ्यावी. शुद्ध मधामध्ये अनेक पोषक तत्व असता. तसेच शुद्ध मध हे शरीराला नुकसान पोहोचवत नाही. मधापासून शरीराला कॉपर, लोह, फॉस्फोरस, मॅग्नेशियम आणि कॅल्शियम सारखी तत्वे मिळतात. मध वजन कमी करण्यातही मदत करते. मध त्वचा निरोगी ठेवण्यातही मदत करते.

**४) दालचिनी**-दालचिनी ही अन्नाची चवही वाढते आणि ते आरोग्यासाठी उपयुक्त ठरते. दालचिनीने रोगप्रतिकार शक्ती वाढते. त्याचबरोबर धुळीच्या ॲलर्जीच्या लक्षणांना कमी करण्यात दालचिनी फायदेशीर ठरू शकते.

ॲलर्जीची लक्षणे घालविण्यासाठी सुक्या मेव्याचेही सेवन हा चांगता पर्याय आहे. दरम्यान, येथे देण्यात आलेली माहिती गृहीतके आणि उपचार सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक माहितीकरिता तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# नेरळ-कळंब मार्गावर एसटी सुरू

## विद्यार्थी, ग्रामस्थांची झाली सोय

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

नेरळ-कळंब मार्गावरील कोल्हारे साई मंदिर ते धामोते या भागातील रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम बस जाण्याइतपत झाल्याने कर्जत आगाराने गुरुवारी (दि. २२) नेरळ-कळंब मार्गावर एसटी बसच्या फेऱ्या सुरू केल्या. त्यामुळे या परिसरातील विद्यार्थी, नोकरदार व ग्रामस्थांची चांगली सोय झाली आहे.

कोल्हारे साई मंदिर ते धामोते या भागातील रस्ता सिमेंट काँक्रीटचा केला जात होता. या कामामुळे एसटी गाड्या बंद असल्याने विद्यार्थी, ग्रामस्थ, कामगारवर्गाला खासगी वाहनांतून प्रवास करावा लागत होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड बसत होता. त्यामुळे या मार्गावर एसटी सुरू करावी, अशी मागणी होत होती. कर्जत आगार व्यवस्थापक शंकर यादव यांनी या रस्त्याची पाहणी केली, परंतु प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न असल्याने त्यांनी रस्ता सुस्थितीत असेल तरच एसटी सुरू करता येईल. असे सांगितले.

कळंब भागातील सामाजिक कार्यकर्ते दिनेश भोईर यांनी रस्त्याचे काम लवकर होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर बस जाण्याइतपत रस्त्याचे काम झाल्याने गुरुवारी कळंब-नेरळ एसटी बससेवा दिनेश भोईर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून सुरू करण्यात आली. आगार व्यवस्थापक शंकर यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील शेमडे, निरंजन दवणे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक देवानंद मोरे, महादेव पालवे, लक्ष्मण पोसटे, नरेश बदे, बस चालक केशव आंधळे, वाहक रवींद्र पादिर आदी उपस्थित होते.



**नेरळ-कळंब रस्त्याचे काम सुरू होते. त्यात रस्ता अगदी अरुंद असल्याने बस सेवा बंद ठेवण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम खात्याने या रस्त्यावरून एसटी सुरू करण्यास हरकत नाही, असे सांगितल्याने आज या मार्गावरून बससेवा सुरू करण्यात येत आहे.**
**-शंकर यादव, आगार व्यवस्थापक, कर्जत एसटी आगार**

# बाप्पांच्या चरणी आलेल्या शालेय वस्तूंचे विद्यार्थ्यांना वाटप

## पेणमधील सह्याद्री प्रतिष्ठानचा अनोखा उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवादरम्यान बाप्पांच्या चरणी भक्तांनी वाहिलेल्या शैक्षणिक साहित्याचे सह्याद्री प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी गुरुवारी (दि. २२) पेणमधील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना वाटप केले.



बाप्पांच्या दर्शनासाठी जाताना गणेशभक्तांनी हार, तुरे, फळे, मिठाई बरोबरच आपल्याला जमेल तसे शैक्षणिक साहित्य बाप्पासमोर ठेवावे, असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठानच्या विद्यार्थी अकादमीने केले होते. त्याला पेणमधील गणेशभक्तांनी चांगला प्रतिसाद दिला. हे शैक्षणिक साहित्य प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी एकत्र केले. व पेण तालुक्यातील अराव, निंबारवाडी, शेडाशी, पाचगणी आणि वेताळपट्टी या पाच शाळेतील सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना वही, पेन्सिल, पेन, शॉपनर, खोडरबर आदी शालेय साहित्याचे वाटप केले. हे शैक्षणिक साहित्य म्हणजे सर्व विद्यार्थ्यांसाठी बाप्पाचा आशीर्वाद आहे, असे प्रतिष्ठानचे राज्य उपाध्यक्ष समीर म्हात्रे यांनी सांगितले.

सह्याद्री प्रतिष्ठानचे पेण तालुका अध्यक्ष केतन म्हात्रे, उपाध्यक्ष रोहित केणी, माजी तालुका अध्यक्ष रोशन टेमघरे, साईराज कदम, स्वप्नील म्हात्रे, विनोद म्हात्रे, नितीन म्हात्रे, आराव शाळेचे मुख्याध्यापक चोरमले, निंबारवाडी शाळेचे मुख्याध्यापक संजय कंक, पाचगणी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना राऊत, वेताळपट्टी शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# चिल्हार नदी कालवा जोड प्रकल्पासाठी स्थानिक ग्रामस्थांची सह्यांची मोहीम

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील चिल्हार नदी उन्हाळ्यात कोरडी असते त्यामुळे नदी काठची गावे तसेच आदिवासी पाड्यांना पाणीटंचाई भासते. चिल्हार नदीला बारमाही वाहती करण्यासाठी कालवा जोड प्रकल्प राबविण्यात यावा, या करीता पाणीटंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांतील ग्रामस्थांनी सह्यांची मोहीम हाती घेतली आहे.



कर्जत तालुक्यातील मोग्रज, पाथरज, बोरिवली, पिंपळोली, कशेळे, टेंबरे आणि वाकस या सात ग्रामपंचायत हद्दीतून चिल्हार नदी जाते. मात्र ही नदी उन्हाळ्यात कोरडी पडत असल्याने नदीकाठची गावे आणि वाड्यांना सर्वाधिक पाणीटंचाई भासते. ही पाणीटंचाई दूर व्हावी, याकरिता गेल्या २० वर्षांपासून प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, मोग्रज गावाच्या मागील बाजूस असलेल्या डोंगराच्या पलिकडे टाटा धरणातील पाणी आणणारे कालवे आहेत. त्यापैकी उजव्या कालव्याचे पाणी डोंगरातून बोगदा काढून चिल्हार नदीमध्ये सोडले तर ही नदी मोग्रज ग्रामपंचायत हद्दीपासून वाहती होईल. आणि मोग्रजसह पाथरज, बोरिवली, पिंपळोली, कशेळे, टेंबरे आणि वाकस ग्रामपंचायत हद्दीतील गावे आणि वाड्यांतील पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी दूर होईल, त्यासाठी मागील महिन्यापासून या भागातील स्थानिक तरुणांनी एकत्र येवून बैठकांचे सत्र सुरु केले आहे. तसेच नदी काठच्या गावांतील सर्व ग्रामस्थांच्या सह्यांची मोहीम हाती घेतली आहे. त्याचवेळी या भागातील सर्व ग्रामपंचायतींनी, डोंगर फोडून बोगदा तयार करण्यात यावा आणि टाटा धरणातील पाणी कालव्याद्वारे पुढे चिल्हार नदीत सोडावे, असे ठराव घेण्यास सुरूवात केली आहे.

कालव्याच्या पाण्यावर हक्क असलेला पाटबंधारे विभाग तसेच जागेची अडचण सोडविण्यासाठी वन विभाग आणि महसूल विभागाला निवेदन देण्याचा आणि हा प्रश्न सुटावा यासाठी संबंधीत ग्रामस्थांनी हालचाली सुरु केल्या आहेत. त्यामुळे या गावांची पाणीटंचाई दूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# महाड आगारातून प्रतापगड बसच्या विशेष फेऱ्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शारदीय नवरात्रौत्सवामध्ये आई भवानीदेवीच्या दर्शनासाठी प्रतापगडावर जाणाऱ्या भक्तांकरिता महाड आगारातून मंगळवार (दि. २६) पासून एसटी बसच्या विशेष फेऱ्या सुरू करण्यात येणार असल्याची झाल्याची माहिती आगार प्रमुख शिवाजी जाधव यांनी दिली.

सोमवारी घटस्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारपासून सुरू होत असलेल्या महाड ते प्रतापगड एसटी बसच्या दररोज दोन फेऱ्यांचे दसऱ्यापर्यंतचे वेळापत्रक महाड एसटी आगाराकडून जाहीर करण्यात आले आहे. यानुसार महाडमधून पहिली बस सकाळी ७ वाजता आणि दूसरी बस दुपारी २ वाजता सुटेल. तर प्रतापगडावरून पहिली बस सकाळी साडेअकरा वाजता आणि दूसरी सायंकाळी साडेपाच वाजता सोडण्यात येणार आहे. भाविकांनी याची नोंद घेऊन सुरक्षित प्रवासासाठी प्रतापगड दर्शन एसटी बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नैसर्गिक शेती करा -माधुरी देशपांडे

## रोह्यात शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**धाटाव : प्रतिनिधी**

नैसर्गिक शेती करा, देशासह आपणही सुजलाम् सुफलाम्, सुदृढ होऊ या, असे आवाहन स्किल विकास फाउंडेशनच्या प्रमुख कृषी अभ्यासक माधुरी देशपांडे यांनी रोहा येथे केले.



रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठान व स्किल विकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील शासकीय विश्रामगृह सभागृहात नुकताच माती विज्ञान आणि नैसर्गिक फायदेशीर शेती या विषयांवरील मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमात माधुरी देशपांडे उपस्थितांना मार्गदर्शन करीत होत्या. या वेळी त्यांनी नैसर्गिक शेती करण्याचा सल्ला दिला.

रासायनिक शेतीला पारंपरिक समजणे दिवसेंदिवस घातक ठरत आहे. रासायनिक किटकनाशके, खतांच्या वाढत्या प्रमाणाने मातीचा दर्जा खालावत आहे. नदी, नाले, समुद्र यांच्यासह पूर्णतः पर्यावरण बिघडत आहे. तापमानात मोठी वाढ झाली आहे. हे वेळीच न थांबवल्यास जगाला धोका आहे. त्यासाठी आपल्या नैसर्गिक शेतीकडे वळा, कॅन्सर व अन्य आजारापासून दूर रहा, असे कृषी अभ्यासक माधुरी देशपांडे या वेळी सांगितले.

शेती ही बहुतांश रासायनिक अनैसर्गिक घटकांनी होत आहे. यातून आपण निसर्ग, जैव चक्रावर अत्याचार करीत आहोत. रासायनिक खते, कीटकनाशके आरोग्य, माती सर्वच घटकांवर परिणाम करत आलो आहे, त्यामुळे शेती पद्धतीत वेळीच बदल करणे गरजेचे आहे, असे सांगत तज्ज्ञ माधुरी देशपांडे यांनी डिजिटल माहितीद्वारे शेती काल आणि आजची समजावून सांगितली.

भाजणी, गवत बाहेर फेकणे हे अज्ञानपणाचे आहे. तेच गवत गादी करावी, त्यावर जीवामृत टाकावे, त्यामुळे मातीचा दर्जा सुधारतो. गांडूळ तयार होतात. दुसरीकडे लाल मुंगी, खेकडा, वाळवी हेही आपले मित्रच आहेत, असे माधवी देशपांडे म्हणाल्या. या वेळी त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

शेतकरी विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, खजिनदार धनंजय जोशी, संचालक विनोद पाटील, दगडू बामुगडे, खेळू थिटे, उमेश पाटील, संतोष दिवकर, विजय दिवकर यांच्यासह शेतकरी बांधव उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ‘बहु’त जणांचे भाऊ कर्मवीर भाऊराव पाटील

महात्मा गांधी नेहमी म्हणायचे महाराष्ट्र एक संस्थाचं मोहोळ आहे. महाराष्ट्राने नेहमीच देशाला दिशा दाखवण्याचं काम केलं. राजकिय, ऐतिहासिक, सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक, सहकार क्षेत्रात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे. महाराष्ट्र अग्रेसर राहण्यामागचं कारण म्हणजे या क्षेत्रातील संस्था आणि कार्यरत असलेलं सुशिक्षित, कुशल मनुष्यबळ. सुशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ महाराष्ट्रात असण्यामागे शिक्षण संस्थांचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्रात अनेक प्रतिष्ठित शिक्षण संस्था नावारुपास आल्या. त्यामध्ये रयत शिक्षण संस्था ही नावारूपास आली.



बहुजनांनी शिकावे, प्रगती करावी यासाठी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यात आणि महाराष्ट्राबाहेरही रयत शिक्षण संस्थेने आपल्या शाळांचे जाळे विणले आहे. गरजू आणि गरीब मुलांना शिक्षण घेता यावे, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांमध्ये साक्षरता वाढावी हा मूळ हेतू या रयत शिक्षण संस्थेचा आहे. या संस्थेची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा येथे केली.

कर्मवीर भाऊराव पाटील म्हणजेच भाऊराव पायगौंडा पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. मुळचे कर्नाटक राज्यातील पाटील कुटुंबीय महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात स्थायिक झाले. भाऊराव लहानपणा पासूनच बंडखोर होते. समाजात होणाऱ्या अन्यायाची त्यांना प्रचंड चीड येत असे. शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात शिक्षणाची आवड निर्माण करणे व वाढवणे. मागावर्गीय गरीब कुटूंबातील मुलांना मोफत शिक्षण. अठरा पगड जातीतील विद्यार्थ्यांमध्ये जात-पात, धर्म, वर्णाची दरी कमी व्हावी आणि त्यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण व्हावेत, एकजूटीचे महत्व कृतीतून पटवून देणे, सर्व मुले काटकसरी, स्वावलंबी आणि समाजाचे एक जबाबदार नागरिक व्हावे यासाठी प्रयत्न करणे ही उद्दीष्टे साध्य करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

गरीब कुटूंबातील अनेक विद्यार्थी जे केवळ शिक्षणासाठी दूर आपल्या घरापासून लांब रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेण्यास येत असत अशा विद्यार्थ्यांसाठी भाऊरावांनी वसतीगृह स्थापन केले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण संस्था आणि वसतीगृह सुरु ठेवण्याचे काम करत असताना भाऊरावांना त्यांची पत्नी लक्ष्मीबाई यांची मोलाची साथ मिळाली. २५ फेब्रुवारी १९२७ रोजी महात्मा गांधीजींच्या हस्ते वसतीगृहाचे ‘श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस’ असे नामकरण करण्यात आले. संस्थेचे समाजाप्रतीचे कार्य पाहून महात्मा गांधी यांनी आपल्या हरिजन सेवक फंडातून वार्षिक पाचशे रुपयांची मदत सुरु केली. तसेच बडोद्याचे सयाजीराव महाराजांनीदेखील चार हजार रुपये देणगी देऊ केली. त्या देणगीच्या माध्यमातून भाऊरावांनी ‘कमवा आणि शिका’ या पद्धतीने चालणारे पहिले ‘फ्रि न्ड रेसिडेन्शिअल हायस्कूल’ सातारा येथेच सुरु केले आणि त्या शाळेला ‘ महाराजा सयाजीराव हायस्कूल’ असे नाव दिले.

हळूहळू राज्याच्या कानाकोपऱ्यात रयत शिक्षण संस्थेच्या शाळा सुरू झाल्या. आजमितीस रयत शिक्षण संस्थेची २० पूर्व प्राथमिक, २७ प्राथमिक, ४३८ माध्यमिक, दोन आयटीआय. आणि ४१ महाविद्यालये आहेत. शिक्षकांची कमतरता जाणवू लागली, तेव्हा भाऊरावांनी आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापन केली. अशा अध्यापक विद्यालयांची संख्या आज आठ आहे. रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्र आणि कर्नाटक मिळून ६७६ शाखा आहेत. रयत शिक्षण संस्था आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. भाऊरावांचे शिक्षण क्षेत्रातले हे कार्य म्हणून जनतेने त्यांना ‘कर्मवीर’ ही पदवी देऊन गौरव केला. तर भारत सरकारनेही त्यांच्या कार्याची दखल घेत ‘पद्मभुषण’ पुरस्काराने सन्मानित केले.

**-स्नेहंकित मुनिश्वर सारंग**
**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,**
**वाशी-नवी मुंबई**

# नागोठणे वाहतूक पोलिसांनी केला चालक दिन साजरा



**नागोठणे : प्रतिनिधी**

वाहनचालक दिनाचे औचित्य साधून नागोठणे वाहतूक पोलीस शाखेतर्फे नुकताच वाहनचालकांचा गौरव करण्यात आला तसेच वाहतुकीच्या नियमांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

चालकांना दळणवळण क्षेत्रातील महत्त्वाचा घटक समजला जाते. या घटकाचा गुणगौरव करण्याच्या दृष्टीने दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी वाहनचालक दिन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे व जिल्हा वाहतूक शाखेच्या प्रभारी पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे वाहतूक पोलीस शाखेतर्फे वाहनचालकांचा गौरव करण्यात आला. या वेळी सहाय्यक फौजदार रमेश पाटील, हवालदार खेडेकर, पोलीस नाईक पाटील आदी उपस्थित होते.


**पेण नगरपरिषद, पेण. जिल्हा-रायगड**
कार्यालय : ०२१४३-२५२०२३ Email : copenmc@gmail.com
जा.क्र.पेनप/का.७/भांडार/निविदा प्रसिध्दी/२०२२-२३/२०९९ दिनांक :- २२/०९/२०२२

**जाहीर निविदा सूचना २०२२-२३**

पेण नगरपरिषदेच्या विविध विभागाकडील कामांकरिता भांडार विभागाकडून पुढील कामाकरिता १) व्हिडीओ शुटींग करून सीडी बनविणे व फोटोग्राफी (अल्बम)करणे २) ऑफिस फर्निचर पुरवठा करणे(वार्षिक निविदा) ३) आपत्कालीन परिस्थीतीत निवारा केंद्रा मधील नागरिकांना भोजन व्यवस्था व निवारा साहित्य पुरविणे बाबत. ह्या विविध कामांकरिता योग्य त्या अनुभवी व इच्छुक पुरवठादार/ठेकेदार यांचे द्विनोंद सिलबंद लिफाफा पध्दतीने जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करणेत येत आहे. पेण नगरपरिषद ,भांडार विभागात निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दि.२३/०९/२०२२ ते दि.०३/१०/२०२२ स.११ ते सायं.५.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील. सदर कामाच्या अटी-शर्ती व कामासंबंधी अतिरिक्त माहिती नगरपरिषद भांडार विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळेल.

सही/-
मुख्याधिकारी,
पेण नगरपरिषद,पेण.



**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
**ई-निविदा सुचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब- १ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात आली आहे.

| अनु | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पमपा/वि.वि/६४/२०२२ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहरातील कनक सरोवर सोसायटी (पाण्याची टाकी), ठाणा नाका रोड ते लामेर रेसिडन्सी, साईनगर रोड येथील रस्ता रुंदीकरणाच्या विकास कामात आणि वाहतूकीस अडथळा निर्माण करणारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे विद्युत खांब, विद्युत वाहिन्या स्थलांतरीत करणे व भूमिगत करणे. | २,७८,३६,५७९/- | १,३९,१८३/- | २३६०/- |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

**जा. क्र/पमपा/विद्युत/३१२२/प्र.क्र.०९/७६७/२०२२**
**दिनांक २२/०९/२०२२**

**सही/-**
**विद्युत विभाग प्रमुख**
**पनवेल महानगरपालिका**

# वीरशैव लिंगायत समाज भवनासाठी भूखंड उपलब्ध करणार -परेश ठाकूर

**उरण : बातमीदार**

वीरशैव लिंगायत समाजाचे धर्मगुरु जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी, (वीरक्तमठ, निंबाळ,अर्जुनगी, समाधान, कलबुर्गी, सोलापूर, बागलकोट, विजयपूर, हुबळी, बेंगळूरू) यांच्या ८०व्या वाढदिवसा (अष्टदशमानोत्सव) निमित्त बुधवारी (दि. २१) फडके नाट्यगृहात गुरुवंदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी वीरशैव लिंगायत समाजासाठी पनवेल महापालिका हद्दीत महात्मा बसवेश्वर भवन व ध्यानधारणासाठी भूखंड उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमाला लिंगायत समाजातील भाविक भक्तांचा मोठा उत्तम प्रतिसाद लाभला. सकाळी इष्टलिंग धारण कार्यक्रम, शिवाजी चौक ते नाट्यगृहापर्यंत कुंभ व शोभा यात्रा, दुपारी परमपुज्य स्वामीजींचे गुरुवंदन व तुलाभार कार्यक्रम, परमपुज्य महास्वामीजीचे दर्शन सोहळा व महाप्रसाद असे विविध कार्यक्रम यावेळी मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. पुज्य संगमेश्वर शिवाचार्य महास्वामी पंचमठ गोग्गीहळी जि. शिवमोग्गा, पुज्यघनबसव अमरेश्वर शिवाचार्य महास्वामी हिरेमठ जडे जि. शिवमोग्गासदाशिव महास्वामीजी शिवलिंगेश्वर विरक्त मठ मूडी जि. हावेरी यांच्या पावन सानिध्यात हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून आमदार गणेश नाईक, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर शशिकांत बिराजदार, सोलापूरचे शिवव्याख्याते शिवरत्न शेटे, शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे महाराष्ट्र मुख्य संघटक नारायण कंकणवाडी, रायगड जिल्हा प्रमुख विनायक म्हमाणे, उद्योगपती शिवलिंगय्या शिवयोगीमठ, शरण संकुलचे जी. बी रामलिंगय्या यांची प्रमुख उपस्थिती होती. मुंबई सदभक्त मंडळी आणि शरण संकुल नवी मुंबई यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## पनवेलमध्ये गुरुवंदन कार्यक्रम





इष्टलिंग धारण व तुलाभार सेवा करण्यात आले. या वेळी वीरशैव लिंगायत समाजातर्फे वीरशैव लिंगायत समाजासाठी महात्मा बसवेश्वर भवनासाठी तसेच ध्यानधारणासाठी पनवेल महानगर पालिकेत भूखंड उपलब्ध करून देण्याची मागणी शरण संकुल सोसायटीचे सह-सचिव आनंद गवी यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे केली. कार्यक्रमावेळी उपस्थित असलेले परेश ठाकूर यांनी वीरशैव लिंगायत समाजासाठी पनवेल महानगर पालिका हद्दीत महात्मा बसवेश्वर भवन व ध्यानधारणासाठी भूखंड उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. या गुरूवंदन कार्यक्रमासाठी ठाणे, मुंबई, पालघर, रायगड परिसरातील लिंगायत समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमृत परमशेट्टी, रवींद्र अंटिन, भिमाशंकर बिराजदार, सूर्यकांत इंगळे, सुनील पाटील, जगदिशप्पा, विठोबा मेत्री, मंजुळा हिरेमठ, स्नेहा हळ्ळी, प्रकाश अवरनळ्ळी, प्रभावती बेल्वानकीमठ, आनंद गवी व इतर अनेक कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

# कामोठे येथील स्मशानभूमीत मृतांच्या नातेवाइकांची गैरसोय

## उपाययोजनेची शिंदे गटाकडून मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहतीमध्ये इतर अनेक समस्या आणि प्रश्न आहेतच. त्याचबरोबर स्मशानभूमीत मरणोत्तर यातना सहन कराव्या लागत आहे. या ठिकाणी पाणी नसल्याने मृतांच्या नातेवाइकांना गैरसोयला सामोरे जावे लागत आहे. याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाकडून करण्यात आली आहे.

कामोठे वसाहतीची लोकवस्ती मोठी आहे. दिवसेंदिवस त्यामध्ये आणखी भर पडत आहे. दोन रेल्वे स्थानक आणि पनवेल सायन महामार्गालगत असणाऱ्या कामोठे कॉलनीमध्ये कनेक्टिव्हिटी मुळे सहाजिकच लोकसंख्या अधिक आहे. त्यामुळे नैसर्गिक व अपघाती मृत्यूंची संख्या सुद्धा जास्त आहे. परिणामी वसाहतीतील स्मशान भूमीमध्ये अंत्यविधीसाठी येणाऱ्या मृतदेहांचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. या ठिकाणी सुविधांचा वानवा आहे. अनेक गोष्टींची कमतरता स्मशानात जाणवते. गेल्या काही महिन्यांपासून कामोठे येथील या स्मशानभूमीत पाणी नसल्याची माहिती पुढे आली आहे. अंत्यविधीसाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. त्याचबरोबर मृतांच्या नातेवाइकांना हातपाय धुण्यासाठी, तसेच केस कर्तनाच्या अगोदर आणि नंतर अंघोळ करावी लागते. त्याचबरोबर शौचालय आणि स्वच्छतागृहातही पाणी नसल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्या मृतांच्या नातेवाइकांची कुचंबणा होत आहे.

स्मशानभूमी महापालिकेकडे हस्तांतरित केली असली तरी पाणीपुरवठा मात्र सिडकोकडूनच केला जातो, परंतु याठिकाणी पाणीच नसल्याने मृतांच्या नातेवाइकांना गैरसोयींना सामोरे जावे लागते. परिणामी कामोठेकरांना मरणोत्तर यातना सहन कराव्या लागतात. यासंदर्भात शिंदे गटाने प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. याबाबत त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी अर्जुन डांगे यांनी केलेली आहे.



**कोणत्याही स्मशानभूमीत पाण्याची उपलब्धता असणे क्रमप्राप्त आहे, परंतु कामोठे वसाहतीतील स्मशानात पाणीच नसल्याचे उघड झाले आहे. कामोठेकरांची गैरसोय टाळण्यासाठी शिवसेनेचे पनवेल जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा केला जाणार आहे.**

**-अर्जुन डांगे, शिवसेना शिंदे गट**

**फोटो - स्मशानभूमी**

# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक उत्साहात

## गव्हाण विद्यालयात प्रतिमेचे अरुणशेठ भगत यांच्या हस्ते पूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये संस्थेचे संस्थापक थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी आणि समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांचे हस्ते तिर्थरूप अण्णा व सौ. वहिनींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, वसंतशेठ पाटील, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे तसेच सर्व रयत सेवक या वेळी उपस्थित होते. प्रारंभी साई मोकल यांच्या संगीत संयोजनाखाली कर्मवीर स्तवन सादर केले. प्रतिमा पूजनानंतर पालखी मार्गस्थ करण्यात आली. लेझीम व झांज पथकाने ढोल ताशांच्या गजरामध्ये पालखी गव्हाण-कोपर-शिवाजीनगर या गावांतून मिरविण्यात आली. ग्रामस्थांनी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करून पालखीचे मनोभावे पूजन करून श्रीफळ अर्पण केले. पालखी मिरवणूक विद्यालयाच्या प्रांगणात परतल्यानंतर आरती करून मिरवणुकीची सांगता झाली.

### उद्या सभा व पारितोषिक वितरण

**पनवेल :** विद्यालयाच्या प्रांगणामध्ये शनिवारी (दि. २४)विद्यालयाच्या प्रांगणामध्ये १३५व्या कर्मवीर जयंतीनिमित्त सभा व पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमास संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व पनवेल विधानसभा मतदारसंघाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर व न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर भट्टे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांचे सुश्राव्य व्याख्यान होणार आहे. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य श्री. वाय. टी. देशमुख व महेंद्र घरत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत व विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांनी दिली.



## रिटघर विद्यालयात विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय-रिटघर येथे पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. ढोल-ताशाच्या गजरात विद्यालयाच्या परिसरात कर्मवीरांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली.

प्रथम कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन क्रांतीकारी सेवा संघाचे अध्यक्ष नामदेव फडके साहेब तसेच विद्यालयातील स्थानिक स्कूल कमिटी सदस्य सुभाष भोपी, बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश पांडूरंग भोपी, वंदना भोपी व वासुदेव भोपी (माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष), प्रल्हाद भोपी (माजी विद्यार्थी संघ उपाध्यक्ष) अनुराधा वाघमारे (सरपंच), निराबाई चौधरी (ग्रा.पं.सदस्य), दर्शना चोधरी (ग्रा.पं.सदस्य), शांताराम चौधरी, दीपक पाटील (पोलीस पाटील), बी. एस. नाईक (माजी मुख्याध्यापिका), प्राचार्य बी. बी. साळुखे व विद्यालयातील सर्व शिक्षक यांच्या हस्ते पूजन करून लेझीम व ढोल-ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.

पालखीच्या वेळी विद्यालयातील सर्व सेवक वर्ग आणि विद्यार्थी, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, मिरवणूकीत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी वेगवेगळी घोषवाक्ये तयार करुन लोकांमध्ये शिक्षण प्रसाराविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.शेवटी विद्यालयाच्या प्रांगणात कर्मवीरांच्या पालखीची आरती केली. या वेळी सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहात सहभाग घेतला होता. श्रीराम महिला बचत गट यांनी विद्यार्थ्यांना गोड खाऊचे वाटप केले व श्री गुरुनाथ उसाटकर यांनी ही विद्यार्थ्यांना केळ्यांचे वाटप केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एम. बी. शेळके यांनी केले. या बातमीचे संकलन प्रसिद्धी विभाग प्रमुख एस.एस. पाटील व सी. एम. भोईर यांनी केले.

# नवीन पनवेल येथे राष्ट्रीय समूहगान स्पर्धा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद, पनवेल या संस्थेच्या वतीने राष्ट्रीय समूहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नवीन पनवेल येथील फडके विद्यालयामध्ये झालेल्या या स्पर्धेत परिसरातील १२ शाळांनी सहभाग घेतला.

या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते तसेच भारतीय संस्कृतीचा परिचय करून देणाऱ्या लोकगीतांचेही सुरेल सादरीकरण करून उपस्थित श्रोत्यांची प्रशंसा प्राप्त केली. फडके विद्यालयाच्या मनिषा महाजन, शीतल साळुंखे व प्रांत पर्यवेक्षक शिवेंद्र आदी मान्यवर या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

राष्ट्रीय गीत स्पर्धेत प्रथम क्रमांक डी. ए. व्ही. पब्लिक स्कूल पनवेल, द्वितीय क्रमांक लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय कामोठे, तर तृतीय क्रमांक सी. के. टी. विद्यालय (इंग्रजी माध्यम) यांनी प्राप्त केला. लोकगीत सादरीकरणात प्रथम क्रमांक डी. ए. व्ही. पब्लिक स्कूल पनवेल, द्वितीय क्रमांक न्यू होरायझन पब्लिक स्कूल पनवेल व लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय कामोठे आणि तृतीय क्रमांक एम. ई. एस. ज्ञानमंदिर कळंबोली यानी प्राप्त केला.



प्रसिद्ध गायक संदीप वीरकर, गायिका मधुरा सोहनी व शाम कोकीळ यानी परिक्षक म्हणून काम पाहिले. शंकर आपटे, गिरीश समुद्र व आभा जांबेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांकप्राप्त शाळेला प्रांतस्तरीय स्पर्धेमधे सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**मोबाइल, बॉलिवुड, रॅप, पॉपच्या जमान्यात अस्सल भारतीय संगीत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे व राष्ट्रप्रेम जागृत करण्याचे उद्दिष्ट ठेवून समूह गान स्पर्धेचे आयोजन केले गेले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात राष्ट्र चेतना जागविण्याची संधी विद्यार्थ्यांना या स्पर्धेच्या निमित्ताने प्राप्त झाली.**

**-शंकर आपटे, भारत विकास परिषद**

# भाजप नेते बबन बारगजे यांचा सत्कार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

कुलाबा येथील बेस्ट भवन येथे बुधवारी (दि. २१) भाजप भटक्या विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांची जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या मार्गदर्शकपदी निवड झाल्याबद्दल प्रदेश संयोजक अशोक चोरमले व गोविंदा गुंजाळकर यांनी त्यांचा सत्कार केला. त्याबद्दल बबन बारगजे यांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व पक्षाच्या जबाबदारी बरोबर ही नवीन जबाबदारीसुद्धा योग्यरितीने पार पाडेन, असे आश्वासन दिले.

या वेळी बेस्ट कर्मचारी संजय नवार, संजय वानखेडे, शिवाजी जायभाये, राजेश गुप्ता व इतर पदाधिकारी उपस्थित होते. प्रदेश सहसंयोजक गोविंदा गुंजाळकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



# पनवेलमध्ये जातवैधता प्रमाणपत्र वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील सर्व ज्युनिअर कॉलेजमध्ये जातवैधता प्रमाणपत्र देण्यासाठी मंगळवारी (दि. २०) पनवेल तालुक्यात जातवैधता प्रमाणपत्र वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार पनवेल विजय तळेकर, उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, रायगड जिल्हा जात पडताळणी समिती अध्यक्ष डॉ. भरत बास्टेवाड, उपाध्यक्ष रवीकिरण पाटील, सदस्य वासुदेव पाटील, पोलीस उपअधीक्षक साधना पाटील उपस्थित होते. या शिबिरामध्ये ६० विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या विद्यार्थ्यांनी अर्ज भरल्यानंतर त्यांना त्याच दिवशी जातवैधता प्रमाणपत्र देण्यात आले. या शिबिराच्या नियोजनाकरिता नायब तहसीलदार विनोद लचके, निवासी नायब तहसिलदार संभाजी शेलार, मंडळ अधिकारी मनोज मोरे, कांबळे, भरत जगदाळे, रायगड जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक योगेश ठाणगे, प्रकल्प सहाय्यक अक्षय साळवी, आनंदराव कदम, पनवेल सेतू केंद्र चालक यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. या शिबिरात जात वैधता प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ, समाज कल्याण विभागाच्या विविध योजना, कातकरी आदिवासी लोकांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले.

# 'सीकेटी'मध्ये उद्या राष्ट्रीय कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे शनिवारी (दि. २४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत, महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त बी. एम. एस. विभागातर्फे संशोधन पध्दती मार्गदर्शन आणि एम. एस. एक्सेल प्रशिक्षण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या एक दिवसीय कार्यशाळेत विविध मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेत संशोधक सहयोगींना आणि विद्यार्थ्यांना संशोधनाच्या महत्त्वाच्या संकल्पना शिकवण्यात येणार आहे तसेच शिक्षकांना संशोधनासाठी प्रोत्साहन देणे हे या कार्यशाळेचे प्रमुख उद्दीष्ट आहे.

या कार्यशाळेच्या मार्गदर्शनासाठी व्यावसायिक व्यवस्थापन महाविद्यालय, हैदराबाद विद्यापीठाचे प्रो. कुलगुरू डॉ. राजा शेखर बेलामकोंडा यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे उपस्थित राहणार आहेत. बी. एम. एस. विभागाच्या प्रमुख प्रा. एम. आर. नलावडे आणि त्यांचे सहयोगी प्राध्यापक हि कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत.

या कार्यशाळेत सहभाग घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव, वाणिज्य विभाग प्रमुख प्रो. डॉ. एलिझाबेथ मॅथुज, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर यांनी आवाहन केले आहे.

# चिंचोटी येथील आरोग्य तपासणी शिबिरास चांगला प्रतिसाद



**अलिबाग : प्रतिनिधी**

सेवा पंधरवडा अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी अलिबाग तालुका मंडळातर्फे गुरुवारी (दि. २२) चिंचोटी येथील श्री हनुमान मंदिराच्या परिसरात आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याचा लाभ ३७८ जणांनी घेतला.

डॉ. केदार ओक, डॉ. तुरे मॅडम व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबिरार्थींची आरोग्य तपासणी व प्राथमिक उपचार करुन ताबडतोब मोफत औषधे दिली. भाजापचे अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, राज्य परिषद कार्यकारिणी सदस्य सतिश लेले, दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस समीर राणे, ज्येष्ठ नेते प्रकाश भांजी, महिला मोर्चा तालुका चिटणीस जानवी पारेख, अलिबाग तालुका युवामोर्चा अध्यक्ष अलाप मढवी, सरचिटणीस निखिल चव्हाण, ओबीसी सेलचे अलिबाग तालुका अध्यक्ष अशोक वारगे, मीडिया सेलचे पंकज अंजारा, बूथ प्रमुख जगदीश कांबळी, चिंचोटी गावातील पंच गजानन पाटील, मनोहर पाटील, प्रदीप पाटील, देवदास पाटील, विजय पाटील, प्रभाकर भांजी, पांडुरंग पाटील, हरिश्चंद्र खोत, मनोहर लक्ष्मण पाटील, अनिल गणपत पाटील, सुरेश पाटील, शशिकांत पाटील, गोपीनाथ पाटील, जगन्नाथ पाटील यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# नवरात्रोत्सव शांततेत साजरा करा -राजन जगताप

**नागोठण्यात शांतता कमिटीची बैठक**



**नागोठणे : प्रतिनिधी**

येणारा शारदीय नवरात्रोत्सव शासनाच्या नियमावलीनुसार साजरा करा, असे आवाहन नागोठणे पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजन जगताप यांनी केले.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागोठणे पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. १९) आयोजित केलेल्या शांतता कमिटीच्या बैठकीमध्ये पोलीस निरीक्षक जगताप उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते.

येत्या सोमवारपासून शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होणार आहे. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू न देता शासनाच्या नियमावलीनुसार नवरात्रौत्सव साजरा करावा, असे पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांनी या बैठकीत सांगितले. शांतता समिती सदस्या अपर्णा सुटे, नितीन राऊत, रुपेश नागोठणेकर, मंगेश शिरसे, प्रकाश ढोबळे, नामदेव वाघमारे, मनोज वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळूंखे, पोलीस उपनिरीक्षक सचिन निकम, हवालदार विनोद पाटील यांच्यासह नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळांचे अध्यक्ष, सदस्य आणि ग्रामस्थ या बैठकीला उपस्थित होते.

## ‘लम्पी‘चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी नागोठण्यात आरोग्य यंत्रणा सतर्क

**नागोठणे : प्रतिनिधी**

लम्पी स्किन रोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी नागोठणे येथील आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

लम्पी हा केवळ गोवंश व म्हैस वर्गातील जनावरांना होणारा त्वचारोग आहे. बाधित जनावरांच्या अंगावर १० ते २० मिलिमिटर व्यासाच्या गाठी येतात. भरपूर ताप येऊन नाका-डोळ्यातून चिकट स्त्राव येतो. लम्पीचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी योग्य ती दक्षता घेण्याबाबत पशुसंवर्धन नागोठणे विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे.

> **लम्पी हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना करून पशुपालकांनी अवश्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. लम्पीची लक्षणे आढळल्यास त्वरित नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधावा.**
>
> **-डॉ. अक्षय सांगळे, पशुवैद्यकीय अधिकारी, नागोठणे**

## खोपोलीत सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीतील मोहनवाडी येथील अमरावती सुमन गिरी (वय ६५) या महिलेचा गुरुवारी (दि. २२) सर्पदंश झाल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली.

अमरावती या गुरुवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घराबाहेर आल्या असता त्यांच्या पायाला सापाने चावा घेतला. मात्र जास्त वेदना होत नसल्याने त्यांनी उपचार घेण्यात टाळाटाळ केली. दरम्यान, शरीरात विष भिनल्याने त्यांची तब्येत बिघडली. त्यांना खोपोली नगर परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## कर्जत तालुक्यात आज ई-पीक पाहणी विशेष मोहीम

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

तालुक्यातील सर्व गावांमध्ये शुक्रवारी (दि. २३) 'एक दिवस ई-पीक पाहणी' साठी ही विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी आपल्या शेतातील पीक पेरा आपण स्वतः ई-पीक पाहणी या मोबाईल अ‍ॅपद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मागील खरीप व रब्बी हंगामामध्ये कर्जत तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ई-पीक पाहणी स्वतः नोंदवली आहे. ही पीक पाहणी २३ सप्टेंबर रोजी होणार आहे.

यावर्षी खरीप हंगामामध्ये आपल्या शेतामध्ये जे पीक पेरले आहे, त्याची ही ई-पीक पाहणी मोबाइल अ‍ॅपद्वारे नोंदवावी व आपला सातबाऱ्यावरील पेरा अद्ययावत करावा. आपल्या सातबारावरील पीक पेरा अद्ययावत असणे, हे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी एक दिवसीय विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिवशी प्रत्येक गावामध्ये कोतवाल, तलाठी हे उपस्थित राहून शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्यासाठी मार्गदर्शन करतील. मंडल अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी तालुक्यातील गावांना भेटी देणार आहेत. गावातील सर्व ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, स्वस्त धान्य दुकानदार या सर्वांनी तसेच त्या गावातील सर्व शेतकऱ्यांनी एक दिवशीय ई-पीक पाहणी मोहिमेमध्ये सहभाग घेऊन गावातील खरीप पिक पेऱ्याची शंभर टक्केची ई-पीक पाहणीची अ‍ॅपमध्ये नोंद होईल, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी केले आहे.

## जिल्हा रुग्णालयामध्ये सीटीस्कॅन मशिन कार्यान्वित

**अलिबाग : जिमाका**

येथील रायगड जिल्हा रुग्णालयामधील सीटीस्कॅन मशिन तांत्रिक बिघाड झाल्यामुळे २८ जुलै २०२२ पासून बंद अवस्थेत होती. त्यामुळे रुग्णसेवेत अडचणी निर्माण होत होत्या, परंतु आता या मशीनची दुरुस्ती करण्यात आली असून, ही सीटीस्कॅन मशीन रुग्णसेवेसाठी कार्यान्वित करण्यात आली आहे, असे जिल्हा रुग्णालयाकडून कळविण्यात आले आहे.

# नागरिकांच्या प्रलंबित अर्जांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम

**अलिबाग : जिमाका**


जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा राबविण्यात येत आहे. त्या निमित्ताने आपले सरकार, नागरी सेवा केंद्र व इतर वेबपोर्टलवरील नागरिकांच्या प्रलंबित अर्जांचा स्थानिक पातळीवर जलदगतीने निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या विशेष मोहिमेमध्ये विविध विभागांच्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नवीन शासन निर्णयानुसार मदत निधीचे वितरण, पंतप्रधान किसान सन्मान निधीचा प्रलंबित पात्र लाभार्थ्यांना लाभ, फेरफार नोंदीचा निपटार, शिधापत्रिकांचे वितरण, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ता हस्तांतरण नोंद, नव्याने नळ जोडणी, मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र, प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजूरी, मालमत्ता हस्तांतरणानंतर विद्युत जोडणीमध्ये नवीन मालमत्ताधारकांचे नाव, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरीकरिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी, अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रलंबित वन हक्कपट्टे मंजूर करणे, दिव्यांगांना प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अशा चौदा सेवांचा प्रामुख्याने समावेश आहे. नागरिकांनी नजिकच्या शासकीय कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या प्रलंबित अर्जांचा निपटारा करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पेणमधील मूर्तिकारांची देवीच्या मूर्ती बनविण्यासाठी लगबग सुरू

**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानंतर आता नवरात्रौत्सव दोन दिवसांवर येऊन ठेपलेला आहे. यंदा नवरात्रोत्सवही निर्बंधमुक्त साजरा होणार आहे. नवरात्रोत्सव धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी सार्वजनिक मंडळांचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. दुर्गामातेच्या मूर्तीसाठी पेणमधील अनेक मूर्तीशाळांना भेट देत आहेत. त्यामुळे मूर्तीकार दुर्गामातेच्या मूर्ती काढण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत.



गेल्या काही दिवसापासून पेण परिसरात पाऊस व ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे मुर्तीकारांना मूर्ती साकारताना व सुकविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. असे असतानादेखील मूर्तीकार पूर्ण ताकदनिशी आपल्या मूर्तीशाळामध्ये दुर्गामातेच्या मूर्ती तयार करण्यात व्यस्त पहायला मिळतात. काही ठिकाणी लाकडाच्या शेगड्यांच्या सहाय्याने मूर्ती सुकविल्या जात आहेत, तर काही ठिकाणी मूर्तींना पॉलिश करणे सुरू आहे. दुसरीकडे रंगकाम, तर काही ठिकाणी रंगापेक्षा दुर्गामातेच्या मुर्तीला नवनवीन वस्त्रे लावण्यात कारागीर व कारखानदार व्यस्त असल्याचे पहायला मिळतात.

पितृपक्ष संपताच सोमवारपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून, सार्वजनिक मंडळांच्या कार्यकर्त्यांसोबत महिलादेखील नवरात्रोत्सवाच्या तयारीला लागलेल्या दिसत आहेत, मात्र गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे मूर्ती सुकविण्याच्या कामात अडथळा येत आहे. त्यातच अचानक मूर्तीच्या उंचीमध्ये मंडळाच्या सभासदांनी केलेल्या वाढीमुळे अनंत चतुर्दशीनंतर कारखानदारांना नव्याने मूर्ती तयार कराव्या लागल्या आहेत. त्या सुकण्यासाठी वेळ लागत आहे. काही ठिकाणी तर लाकडांच्या सहाय्याने मूर्ती सुकविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यातच मंडळाच्या सभासदांकडून रंगापेक्षा खरेखुरे कपडे परिधान करून मूर्ती सजवून मागितल्या जात आहेत. मूर्ती ओल्या असल्याने ते काम करणे कठीण होत आहे. १५ ते २० तास काम करूनदेखील आलेल्या ऑर्डर पूर्ण होतील की, नाही याबाबत साशंका निर्माण झाली आहे, अशी माहिती अंतोरा येथील गावदेवी कला केंद्राचे कारागीर अजित लांगी यांनी दिली.

## दिव्यांगाकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

**अलिबाग : जिमाका**

भारतीय उद्योजकता विकास संस्था व टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील जिल्हा उद्योग केंद्रमध्ये मंगळवारी (दि. २०) दिव्यांगाकरिता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय उद्योजकता विकास संस्थेचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. श्री.हरळय्या यांनी प्रशिक्षणार्थींना जिल्हा उद्योग केंद्राद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयी मार्गदर्शन करुन प्रशिक्षणात शिकविण्यात येणाऱ्या विषयांची सविस्तर माहिती दिली. या प्रशिक्षणाला अलिबाग तालुक्यातील दिव्यांग प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शशिकांत दनोरीकर यांनी आभार मानले.

# लोणेरे येथे अंधश्रद्धा निर्मूलन प्रशिक्षण कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस)-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने लोणेरे येथील जे. बी. सावंत हायस्कूलमध्ये मंगळवारी (दि.२०)अंधश्रद्धा निर्मूलन प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागामधील एकूण ३४ विद्यार्थी, स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

अंनिसचे माणगाव शाखा अध्यक्ष भाऊसाहेब सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या प्रशिक्षण कार्यशाळेचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. चंद्रकांत माळी यांनी केले. अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष मोहन भोईर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाची चतुःसूत्री समजावून सांगितली. व त्याद्वारे आपण अंधविश्वास व अंधश्रद्धा यांचे निर्मूलन कसे करू शकतो, हे सांगितले. बुवाबाजी करणारे आपल्याला कशाप्रकारे फसवतात, याची प्रात्यक्षिके मोहन भोईर आणि अमित निंबाळकर यांनी सादर केली. या वेळी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. प्राचार्य हर्षल जोशी, सुभाष टेंभे या वेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थिनी कांचन यादव हिने आभार मानले. महाविद्यालयातील डीएलएलई विभागाचे समन्वयक व ग्रंथपाल अमित बाकडे, हर्ष साळवी, कुणाल मानके, निशा तेटगुरे, अंकिता राऊत, शिवकुमार सिंग यांच्यासह विद्यार्थी, स्वयंसेवकांनी ही प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी करण्याकरिता विशेष परिश्रम घेतले.



## वारे येथील शाळेसाठी सुसज्ज शौचालय

**रोटरी क्लब डोंबिवली सिटी, आरंभ संस्थेचा उपक्रम**

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील वारे येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची शौचालय अभावी कुचंबणा होत होती. त्याबाबत शिक्षक रवी काजळे यांनी प्रयत्न केल्यानंतर रोटरी क्लब डोंबिवली आणि आरंभ संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वारे येथील शाळेत अद्ययावत शौचालय उभारण्यात आले आहे.

वारे येथील प्राथमिक शाळेत १०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. येथील २५ वर्षांपूर्वी बांधलेले शौचालय नादुरुस्त झाले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होय होती. ही बाब झुगरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक रवी काजळे यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर रोटरी क्लब डोंबिवली सिटी या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी वारे येथे येऊन शाळा आणि शौचालयांची पाहणी केली. त्यानंतर विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी साडेचार लाख रुपये खर्च करून अद्ययावत



शौचालय उभारले. वारे ग्रामस्थ (अभियंता)विजय म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली या शौचालयाचे काम पूर्ण करण्यात आले. या कामासाठी रोटरी क्लब अध्यक्ष विजय नाझरे, सेक्रेटरी संकेत शहा, आरंभ संस्थेच्या शोभा मूर्ती यांनी सॅनडोझ कंपनीच्या सीएसआर फंडातून निधी मिळवून दिला.

## सावरट शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी केला शिक्षकांचा सन्मान



**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील सावरट गावामधील शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी पस्तीस वर्षानंतर एकत्र येऊन एका छोट्याखानी कार्यक्रमात तत्कालीन शिक्षकांचा सन्मान करीत शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

महाड तालुक्यातील सावरट गावातील प्राथमिक शाळेत ३५ वर्षापूर्वी शिक्षण घेणारे विद्यार्थी गणेशोत्सवानिमित्त एकत्र आले होते. त्यांनी तत्कालीन शिक्षक दत्तात्रय रघुपती मोकल (अलिबाग), सुरेंद्र जाधव (पोलादपूर), शालिनी मोकल (अलिबाग) यांचा यथोचित सन्मान केला. उतारवयात आपल्या शिष्यांना भेटता आल्याने शिक्षकांचा आनंद गगनात मावत नव्हता. सरपंच निर्मला शिवाजी पिसाळ, तंटामुक्त गाव अध्यक्ष सुरेश कदम, माजी सरपंच चंद्रकांत मोरे, रामजी मोरे, मनोहर कडू, किरण शिरगावकर, मुंबई मंडळ अध्यक्ष राजन सावळे या वेळी उपस्थित होते.

मनीषा मोरे, मंदा आमकर, सुनील कदम, संदीप कदम, रामजी होगाडे, मंगेश होगाडे, किशोर पोळेकर, मंगेश साळुंखे, निलेश मोरे, राकेश कडू, करुणा शिंदे, सुवर्णा धनावडे, पांडुरंग मोरे, बाळाराम पवार गणेश मोरे, जितेंद्र पवार, शरद बेंदूगडे, बोंबी आमले, संतोष सावळे आदी माजी विद्यार्थी या वेळी एकत्रित आले होते. ३५ वर्षांनी आपल्या शाळेत पुन्हा जमलेल्या या विद्यार्थ्यांनी आपला आनंद विविध आठवणी सांगून व्यक्त केला. या कार्यक्रमाचे नियोजन संतोष सुतार, अमित जाधव, संतोष सणस, भाई राऊत, शिवाजी पिसाळ, शारदा धनावडे, ज्ञानदेव मोरे यांनी केले होते.

# भारतीय महिला संघाने इंग्लंडला चारली धूळ

## हरमनप्रीत कौरची शतकी खेळी; २३ वर्षांनी इंग्लंडमध्ये विजय



**इंग्लंड : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडचा ८८ धावांनी पराभव केला. या विजयासह भारतीय संघाने तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. टीम इंडियाने २३ वर्षांनंतर इंग्लंडमध्ये एकदिवसीय मालिका जिंकली आहे. यापूर्वी चंद्रकांता कौलच्या नेतृत्वाखाली भारताने १९९९मध्ये इंग्लंडमध्ये एकदिवसीय मालिका २-१ने जिंकली होती. तब्बल २३ वर्षांनंतर भारतीय महिला संघाने इंग्लंडमध्ये एकदिवसीय मालिका जिंकण्याचा कारनामा केला.

इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने ५० षटकांत पाच गडी गमावून ३३३ धावा केल्या. हरमनप्रीत कौरने १११ चेंडूत १४३ धावांची नाबाद खेळी खेळली. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संपूर्ण संघ ४४.२ षटकांत २४५ धावांवर बाद झाला. इंग्लंडकडून डॅनियल व्याटने ६५ धावा केल्या. वेगवान गोलंदाज रेणुका सिंगने चार गडी बाद केले. त्याआधी भारतीय संघाची शेफाली वर्मा पुन्हा एकदा अपयशी ठरल्यानंतर स्मृती मंधाना व यास्तिका भाटिया यांनी ५४ धावांची भागिदारी केली. दोघी अनुक्रमे ४० व २६ धावा काढून बाद झाल्या. त्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौर व हरलीन देओल यांनी डावाची सूत्रे हाती घेत ११३ धावांची भागीदारी केली. हरलीनने अर्धशतक साजरे केले. ती ५८ धावा करून बाद झाल्यानंतर पूजा वस्त्रकार व दीप्ती शर्मा यांनी हरमनप्रीतला सुयोग्य साथ देत भारताला मोठी धावसंख्या उभारून देण्यात योगदान दिले.

हरमनप्रीतने एकदिवसीय कारकिर्दीतील पाचवे शतक झळकावले. पूजा वस्त्राकर १६ चेंडूत १८ धावा करून बाद झाली. यानंतर हरमनप्रीत आणि दीप्ती शर्माने सहाव्या गड्यासाठी २४ चेंडूत ७१ धावांची नाबाद भागीदारी केली. अशाप्रकारे भारताने इंग्लंडसमोर ३३४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. ३३४ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंड संघाची सुरुवात खराब झाली. ४७ धावांपर्यंत संघाने तीन गडी गमावले होते. टॅमी ब्युमॉन्ट सहा, एम्मा लॅम्ब (१५ धावा) आणि सोफिया डंकलेने एक धावा केल्या. यानंतर एलिस कॅप्सी आणि डॅनियल व्याट यांनी चौथ्या गड्यासाठी ५५ धावांची भागीदारी रचली. एलिस ३६ चेंडूत सहा चौकारांच्या मदतीने ३९ धावा करून बाद झाला. त्याचवेळी डॅनियलने अर्धशतक झळकावले. ती ५८ चेंडूत सहा चौकारांच्या मदतीने ६५ धावा करून बाद झाली. यानंतर नियमित अंतराने इंग्लंडच्या गडी बाद होत राहिले.

अखेर इंग्लंड संघ २४५ धावांवर सर्वबाद झाला व भारतीय संघाने ८८ धावांनी विजय साकार केला. वेगवान गोलंदाज रेणुका सिंगने चार बळी आपल्या नावे केली.

## महिला आशिया चषकसाठी भारतीय संघ जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अखिल भारतीय महिला निवड समितीने महिला टी-२० आशिया चषक २०२२साठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. १ ते १५ ऑक्टोबरदरम्यान बांगलादेशातील सिल्हेट येथे होणाऱ्या या स्पर्धेत हरमनप्रीत कौर संघाचे नेतृत्व करणार आहे.

शेफाली वर्मा, रिचा घोष, स्नेह राणा, डी हेमलता, मेघना सिंग, रेणुका ठाकूर, राधा यादव आणि केपी नवगैरे या खेळाडू पहिल्यांदाच महिला आशिया चषक खेळणार आहेत. तान्या भाटिया, सिमरन दिल बहादूर यांना राखीव खेळाडू म्हणून ठेवण्यात आले आहे. १ ऑक्टोबरपासून या स्पर्धेला सुरुवात होणार असून अंतिम सामना १५ ऑक्टोबरला होणार हे. या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका, थायलंड, मलेशिया, यूएई आणि बांगलादेशचे संघ सहभागी होणार आहेत.

आशिया कपमध्ये भारताचा सामना ७ ऑक्टोबरला पाकिस्तानशी होणार आहे. ही स्पर्धा राऊंड रॉबिन पद्धतीने आयोजित केली जाईल. ज्या अंतर्गत अव्वल चार क्रमांकावर असलेले संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. त्याचबरोबर आशिया कपमध्ये भारत-पाकिस्तान, यजमान बांगलादेश, श्रीलंका, यूएई, थायलंड आणि मलेशियाचे संघ सहभागी होणार आहेत.

अफगाणिस्तानमध्ये तालिबानच्या राजवटीनंतर अफगाणिस्तानमध्ये महिला संघ आशिया चषकमध्ये नाही. आशिया चषकाचा पहिला सामना भारत आणि बांगलादेश यांच्यात १ ऑक्टोबरला होणार आहे.

## दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत रहाणे, अय्यर अपयशी



**कोइम्बतूर : वृत्तसंस्था**

दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम लढतीच्या पहिल्या दिवशी पश्चिम विभागाच्या फलंदाजांनी हार पत्करली. कर्णधार अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यरसह त्यांच्या प्रमुख फलंदाजांना अपयश आले. दक्षिण विभागाने पहिल्या दिवशी पश्चिम विभागाला आठ बाद २५० धावसंख्येवर रोखले.

पहिल्या दिवसाचा खेळ थांबला, तेव्हा यष्टीरक्षक फलंदाज हित पटेल ९६ आणि जयदेव उनाडकट ३९ धावांवर खेळत होता. दक्षिण विभागाकडून साई किशोरने ३ बळी मिळवले. प्रथम फलंदाजी करण्याची संधी मिळाल्यावर पहिल्या तासाभराच्या खेळातच पश्चिम विभागाने रहाणे (८), अय्यर (३७), सर्फराज खान (३४), यशस्वी जैस्वाल (१), प्रियांक पांचाळ (७) हे प्रमुख फलंदाज एकामागून एक गमावले. त्यानंतर आर. साई किशोरच्या फिरकीने पश्चिम विभागाच्या अडचणी वाढवल्या.

**संक्षिप्त धावफलक**

पश्चिम विभाग (पहिला डाव) : ९० षटकांत ८ बाद २५० (हित पटेल खेळत आहे ९६, जयदेव उनाडकट खेळत आहे ३९; आर. साई किशोर ३/८०, बसिल थम्पी २/४२, सी. बी. स्टिफन २/३९)

## जसप्रीत बुमराहच्या फिटनेसबद्दल साशंकता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना हा मोहालीत झाला. वेगवान गोलंदाजांसाठी पोषक खेळपट्टी असलेल्या मोहालीत भारताची ऑस्ट्रेलियात खेळवण्यात येणारी अंतिम प्लेईंग ११ सामन्यात बुमराह उतरेल असे वाटले होते, मात्र भारताचा अव्वल गोलंदाज जसप्रीत बुमराह ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या पहिल्याच सामन्यात खेळला नाही. यामुळे बुमराह अजून फिट झाला आहे की, नाही याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.



दरम्यान, रोहितने जसप्रीत बुमराह पहिल्या सामन्यासाठी का खेळणार नाही याचे कारण सांगितले. रोहित शर्मा म्हणाला की, जसप्रीत बुमराह गेम ब्रेक घेणार आहे. तो शक्यतो दुसऱ्या किंवा तिसऱ्या सामन्यात खेळेल.

## प्रो-कबड्डीचा थरार ७ ऑक्टोबरपासून

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रो-कबड्डी लीगच्या आगामी मोसमाचे बिगुल वाजले आहे. बंगळुरुमधील श्री कांतीरवा इनडोअर स्टेडियममध्ये या मोसमातील पहिल्या सत्राला सुरुवात होणार आहे. त्यानंतर २७ ऑक्टोबरपासून पुणे, बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात या लीगचा मोर्चा वळणार आहे.



या मोसमात प्रो-कबड्डी लीगच्या लढती स्टेडियममध्ये जाऊन पाहण्याची संधी कबड्डीप्रेमींना मिळणार आहे. या स्पर्धेच्या पहिल्या तीन दिवसांतच तिहेरी सामन्यांचा आनंद घेता येणार आहे. पहिल्या ६६ सामन्यांच्या वेळापत्रकामध्ये पहिल्या दोन दिवसांतच सर्व १२ संघ मैदानावर उतरणार आहेत. इतकेच नव्हे तर प्रो-कबड्डी लीगच्या साखळी फेरीत दर शुक्रवारी व शनिवारी तीन-तीन सामने रंगणार आहेत.

सलामीची लढत गतविजेता दबंग दिल्ली-यू मुंबा यांच्यामध्ये रंगणार असून त्याच दिवशी दुसरा सामना बंगळूर बुल्स विरुद्ध तेलुगू टायटन्स यांच्यात तर युपी योद्धाज-जयपूर पिंक पँथर्स यांच्यात तिसरा सामना होणार आहे. या स्पर्धेसाठीच्या तिकिटाचे बुकिंग www.prokabaddi.com या संकेतिक स्थळावर करता येणार आहे.











**पनवेल :** आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी सकाळी ११ वाजता पुलावर भर पावसात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते. सुमारे दीड तास भर पावसात रास्ता रोको करण्यात आला. सिडकोने आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. नागरिकांना झालेल्या त्रासाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलगिरी व्यक्त केली.

## भारत-ऑस्ट्रेलिया सामना तिकीटासाठी झुंबड

**हैद्राबाद : वृत्तसंस्था**

हैद्राबाद येथे भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान तिसरा टी-२० सामना शुक्रवारी (दि. २३) होणार आहे. या सामन्याच्या तिकीट खरेदीसाठी प्रेक्षकांची हैद्राबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर झुंबड उडाली असून पोलिसांनी गर्दीवर लाठीचार्ज केला. या प्रकरणाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान तीन टी-२० सामन्यातील शुक्रवारी दुसरा सामना असून तिसरा सामना हैद्राबाद येथे होणार आहे. पहिल्या सामन्यात भारताला पराभव झाला होता. भारतीय संघ आता शुक्रवारी नागपूरमध्ये ऑस्ट्रेलियाशी भिडणार आहे. भारतीय संघ मालिकेत ०-१ ने पिछाडीवर आहे.

## राज्य कबड्डी पंच परीक्षा २५ सप्टेंबरला

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने राज्य पंच मंडळाच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि. २५) महाराष्ट्रातील १९ केंद्रावर राज्य पंच परीक्षा घेण्यात येणार आहे. या १९ केंद्रावर अंदाजे ८०० परीक्षार्थी या परीक्षेस बसणार आहेत.

मिनानाथ धानजी, सतीश सूर्यवंशी, अलेक्झांडर मणी, बी.जे.पाटोळे, निवृत्ती आजगेकर, सदानंद माजलकर, रवींद्र म्हात्रे, रोहिणी अरगडे, संगीता मोरे, प्रा. नवनाथ लोखंडे, लक्ष्मण मोहिते, राजेंद्र अनुभवणे, योगेश यादव, मालोजी भोसले, नितीन कदम, भरत मुळे, सूर्यकांत कदम, सुहास पाटील, सुरेश जोशी, विनोद पाटील, संजीव मोरे, लक्ष्मण बेल्लाळे आणि शशिकांत राऊत हे पर्यवेक्षक या केंद्रांवर लेखी, तोंडी आणि मैदानी प्रात्यक्षिक परीक्षा घेतील. अधिकृत परीक्षा प्रवेश अर्ज भरल्याशिवाय कोणालाही परीक्षेला बसू दिले जाणार नाही. या परीक्षेस बसलेल्या सर्व परिक्षार्थींनी दिलेल्या वेळेच्या १५ मिनिटे अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित रहाणे आवश्यक आहे. असे राज्य कबड्डी असोसिएशनचे सरचिटणीस आस्वाद पाटील यांनी कळविले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com